## देवेंद्र फडणवीस यांनी घेतली एकनाथ शिंदेंची भेट



**मुंबई :** महायुतीचे सरकार स्थापन करण्याच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला असून भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. ३) काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी राजधानी दिल्लीत केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. या बैठकीनंतर शिंदे आपल्या गावाकडे निघून गेले होते. दोन दिवस तिथे मुक्काम केल्यानंतर ते परतले, पण त्यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे भेटीगाठी, नियोजित बैठका रद्द केल्या होत्या. शपथविधीला काही तास शिल्लक असताना फडणवीस आणि शिंदेंची भेट झाली. मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या वर्षावर दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा तास चर्चा झाली. या वेळी फडणवीसांनी शिंदेंच्या प्रकृतीची विचारपूसही केली.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १३८
www.ramprahar.com

बुधवार, ४ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष रेल्वेगाड्या/२

दारूचे समान वाटप न झाल्याने हल्ला; एक जखमी/५

सरावादरम्यान स्टिव्ह स्मिथ दुखापतग्रस्त/८


# शपथविधी सोहळ्याची जय्यत तयारी

## ■ महायुतीच्या नेत्यांची आझाद मैदानात एकत्र पाहणी



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीनंतर आता सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. येत्या ५ डिसेंबर रोजी नवीन सरकारचा शपथविधी सोहळा मुंबईतील आझाद मैदानावर होणार असून हा सोहळा भव्यदिव्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. ३) महायुतीच्या नेत्यांकडून शपथविधी सोहळ्याच्या तयारीची एकत्रित पाहणी करण्यात आली.



नवीन सरकारच्या शपथविधी सोहळयाला ७०हून अधिक व्हीव्हीआयपी नेते उपस्थित राहणार आहेत. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, महामार्ग आणि रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मंत्र्यांना निमंत्रण देण्यात आले आहे.

याशिवाय महाराष्ट्राच्या नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाही निमंत्रण पाठवण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे या शपथविधी सोहळ्यासाठी देशभरातील अनेक साधू-महंतांनाही निमंत्रण पाठवण्यात आले आहे. यामध्ये नरेंद्राचार्य महाराज, गोविंददेवगिरी महाराज, बागेश्वर बाबा, महामंडलेश स्वामी विश्वेश्वरानंद महाराज, जैन संत लोकेश मुनी, बंजारा संत, शीख संत, बौद्ध भिक्खू यांचा समावेश आहे. याशिवाय काशी विश्वनाथ मंदिराचे मुख्य पुजारी आणि महाकाल मंदिराचे मुख्य पुजारी यांच्यासह महाराष्ट्रातील प्रमुख मंदिरांच्या मुख्य पुजाऱ्यांनाही निमंत्रण देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे विविध समाजाच्या प्रतिनिधींनाही निमंत्रणे पाठवण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

शपथविधी सोहळयाच्या तयारीची महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी मंगळवारी आझाद मैदानात जाऊन पाहणी केली. यात भाजपकडून गिरीश महाजन, प्रवीण दरेकर, चंद्रशेखर बावनकुळे; शिवसेनेकडून संजय शिरसाट, गुलाबराव पाटील; राष्ट्रवादी काँग्रेसकडून हसन मुश्रीफ, अनिल पाटील आदी उपस्थित राहिले.

नव्या सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता होईल, परंतु मुख्यमंत्री कोण? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. भाजपने गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार बुधवारी (दि. ४) भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक होत असून या बैठकीत मुख्यमंत्री कोण असेल हे कळू शकेल. यापूर्वी काळजीवाहू मुख्यमंत्री व शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे, भाजप नेते देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादीचे प्रमुख अजित पवारांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांची भेट घेतली होती. त्यानंतर आता घडामोडींना वेग आला आहे.

# रामकी कंपनीची भिंत कोसळलेल्या परिसराची आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली पाहणी

### सिद्धी करवले ग्रामस्थांसोबत समिती नेमण्याची सूचना

### मनपा व प्रदूषण नियंत्रण मंडळासोबत होणार बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामकी कंपनीभोवती बांधण्यात आलेली संरक्षण भिंत गुरुवारी कोसळली. सुरक्षा भिंतीवर लिचडचा भार येऊ नये याची काळजी घेणे गरजचे असूनही निष्काळजीमुळे ही भिंत कोसळल्याची तक्रार गावकऱ्यांनी केली आहे. दरम्यान, या संदर्भात पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि या अनुषंगाने योग्य उपाययोजना करण्याची गरज लक्षात घेता गावकऱ्यांसोबत एक समिती नेमावी, अशी सूचना केली. त्यानुसार येत्या सोमवार किंवा मंगळवारी पनवेल महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासोबत बैठक होणार आहे.

तळोजा एमआयडीसीसह मुंबई परिसरातील कंपन्यांच्या रासायनिक कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्याचे काम रामकी ग्रुपची मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी करते. दोन वर्षापूर्वी येथील प्रदूषणामुळे त्रस्त असलेल्या नागरिकांनी कंपनीभोवती सुरू केलेल्या उंच सुरक्षा भिंतीला विरोध केला होता. सिद्धी करवले येथील स्थानिकांनी आंदोलन केले होते. वर्षभरापूर्वी बांधण्यात आलेली भिंत गुरुवारी कोसळली. सिद्धी करवले गावात जाणाऱ्या एकमेव रस्त्याला लागून असलेली भिंत कोसळल्यामुळे ग्रामस्थ चिंतेत आहेत. कंपनीतील रसायनयुक्त लिचडचा भार भिंतीवर टाकल्यामुळे ती कोसळल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

सुरक्षा भिंतीवर लिचडचा भार येऊ नये याची काळजी घेणे गरजचे असूनही निष्काळजीमुळे स्थानिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप करीत स्थानिकांनी पोलीस उपायुक्त, एमआयडीसी प्रदूषण नियंत्रक मंडळ आदींकडे तक्रार केली आहे. साधारणतः ३० ते ३५ फूट उंचीच्या भिंतीवर कचऱ्याचा मोठा लोड आल्याने ही घटना घडली. सुदैवाने यात जीवितहानी झाली नसली या संदर्भात काळजी न घेतल्यास भविष्यात या ठिकाणी मोठे अपघात घडू शकतात.

शंभर एकरात ही कंपनी कार्यान्वित आहे. रासायनिक आणि वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करून विघटित केला जातो, मात्र कंपनीकडून नियम पाळले जात नसल्याचा आरोप अनेक वेळा केला गेला आहे. संरक्षण भिंत कोसळल्याने या घटनेच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी घटनास्थळी मंगळवारी (दि. ३) भेट दिली. या ठिकाणी जिथे भिंत पडली तेथे भिंतीचा आणखी भाग पडण्याचीही शक्यता असल्याने त्या संदर्भात त्यांनी उपाययोजनेसंदर्भात आयुक्तांशी चर्चा केली.

या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, रविकांत म्हात्रे, माजी सरपंच गोपीनाथ पाटील, संतोष पाटील, रमेश मढवी, सुरेश पोरजी, माजी सरपंच विष्णू मढवी, संतोष मढवी, वासुदेव मढवी, राजेश महादे यांच्यासह मुंबई वेस्ट मॅनेजमेंटचे अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## निवडक

### ताजमहाल बॉम्बने उडवण्याची धमकी; सुरक्षाव्यवस्थेत वाढ

**आग्रा :** जगप्रसिद्ध असलेल्या ताजमहालला बॉम्बने उडवून देण्याच्या धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांना सतर्क करण्यात आले असून ताजमहलच्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये वाढ करण्यात आली आहे. पर्यटन विभागाला आलेला धमकीचा मेल कुठून आला व कुणी पाठवला याचा आग्रा पोलीस तपास करीत आहेत.

### पी.व्ही. सिंधू लवकरच अडकणार लग्नाच्या बेडीत

**हैदराबाद :** भारताची प्रसिद्ध बॅडमिंटनपटू आणि दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंध लवकरच विवाहबंधनात अडकणार आहे.



तिचा विवाह २२ डिसेंबर रोजी राजस्थानमधील उदयपूर येथे, तर २४ डिसेंबरला हैदराबादमध्ये रिसेप्शन होणार आहे. सिंधू ही व्यंकट दत्ता साईशी लग्न करणार आहे. ते वरिष्ठ आयटी व्यावसायिक आणि पोसाइडेक्स टेक्नॉलॉजीजचे कार्यकारी संचालक आहेत.

# श्रीवर्धनमधील वृद्धाची हत्या संपत्तीच्या लालसेतून

## गुन्हे अन्वेषण विभागाकडून दाम्पत्याला अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथील रामदास गोविंद खैरे या वयोवृद्ध व्यक्तीच्या हत्येची उकल करण्यात रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला (एलसीबी) यश आले आहे. संपत्तीच्या लालसेतून त्यांची हत्या झाल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी एलसीबीने पती-पत्नीला अटक केली आहे.

रामदास खैरे (वय ७२) हे श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीतील कुंदन रेसिडेन्सीमध्ये एकटेच राहत होते. त्यांचा फोन बंद असून संपर्क होत नसल्याची तक्रार श्रीवर्धन पोलिसांना प्राप्त झाली. त्यामुळे पोलीस निरीक्षक रिकामे यांनी त्यांच्या घरी जाऊन पाहणी केली. या वेळी रामदास खैरे यांची हत्या करण्यात आल्याचे उघडकीस आले. या घटनेची माहिती मिळताच श्रीवर्धनच्या उपविभागीय



पोलीस अधिकारी सविता गर्जे यांनी घटनास्थळाला भेट दिली. यानंतर या प्रकरणी अज्ञातांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला या गुन्ह्याचा समांतर तपास करण्याचे आदेश दिले होते. पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी गुन्ह्याच्या तपासासाठी दोन पथकांचे गठन करून तपासाला सुरुवात केली. तांत्रिक पुराव्यांच्या सहाय्याने दोन संशयित आरोपी निष्पन्न केले. त्यानंतर कळवा ठाणे आणि चेंबूर येथून एक महिला आणि एक पुरुष अशा दोघांना अटक करण्यात आली. संपत्तीच्या लालसेतून ही हत्या झाल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

रामदास खैरे यांच्या पत्नीचे निधन झाल्याने ते गावी एकटेच राहत होते. एकाकी राहत असल्याने त्यांनी मित्राच्या मदतीने एका महिलेशी लग्न करण्याचे ठरवले होते, मात्र या महिलेने त्यांच्याकडे मुंबईत घर आणि दागिने घेऊन देण्याची मागणी केली होती. ही मागणी पूर्ण करू शकत नसल्याने त्यांनी लग्नास नकार दिला. दरम्यान, या महिलेने तिच्या एका परिचयातील महिलेला रामदास खैरे यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याशी जवळीक साधण्यास सांगितले होते. **(पान २ वर..)**

# नॅक पिअर टीमची सीकेटी कॉलेजला भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक) ही देशभरातील उच्च शिक्षण प्रदान करणाऱ्या शैक्षणिक संस्थांचे शास्त्रीय पद्धतीने शैक्षणिक परीपेक्ष्य, अध्ययन-अध्यापन प्रणाली, विस्तारकार्य, संशोधन, पायाभूत सुविधा, व्यवस्थापन आदी निकषांच्या आधारे मूल्यांकन करून त्यांना श्रेणी प्रदान करते. याच धर्तीवर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजच्या (स्वायत्त) चौथ्या मूल्यांकनाच्या फेरीसाठी नॅक पिअर टीमने २ व ३ डिसेंबर रोजी भेट दिली. या भेटीदरम्यान नॅक पिअर टीम सदस्यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक, सहशैक्षणिक, विस्तार विभाग तथा पायाभूत सुविधांची पाहणी केली.

नॅक पिअर टीमचे चेअरमन कलिंगा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. श्रीधर, समन्वयक सदस्य म्हणून सरदार पटेल विद्यापीठ, गुजरातमधील जैविक विज्ञान विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. कमलेशकुमार पटेल व यमुनानगर हरियाणा येथील गुरुनानक गर्ल्स कॉलेजच्या संचालिका डॉ. वरिंदर गांधी यांचे महाविद्यालयाच्या संकुलात २ डिसेंबर रोजी सकाळी आगमन झाले. महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या विद्यार्थ्यांनी नॅक पिअर टीम सदस्यांना मानवंदना दिली.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडदे यांनी नॅक पिअर टीम सदस्यांचे यथोचित स्वागत व सन्मान केला. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी नॅक पिअर टीम सदस्यांसमक्ष महाविद्यालयाचे सर्वंकष सादरीकरण केले. त्यानंतर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ.बी. डी. आघाव यांनी सादरीकरण केले. तसेच विविध शैक्षणिक विभागांचे सादरीकरण होऊन समितीने विस्तार उपक्रमांच्या विभागांना, ग्रंथालय आदी ठिकाणी भेट दिली.

सर्व विभागांच्या भेटी झाल्यानंतर विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, यांच्यासोबत परिसंवाद झाला. यानंतर मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. रवींद्र कुलकर्णी आणि प्र. कुलगुरू डॉ. अजय भामरे यांनी महाविद्यालयास भेट दिली. सांस्कृतिक कार्यक्रमाने पहिल्या दिवसाची सांगता झाली. समितीने दुसऱ्या दिवशी महाविद्यालयाच्या बॉटनिकल गार्डन, बायोफर्टीलायझर प्लांट या ठिकाणी भेट दिली. दुपारनंतर मूल्यमापन अहवाल लेखन आणि समारोप कार्यक्रमानंतर यशस्वीरित्या सांगता झाली.

# रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांची लगबग

**मुरुड : प्रतिनिधी**

खरिपानंतर आता रब्बी हंगाम सुरू झाला असून शेतकऱ्यांनी वेगवेगळी पीके घेण्यासाठी तयारी सुरू केली आहे. रायगड जिल्ह्यात रब्बी



हंगामात भातशेतीव्यतिरिक्त कडधान्य, भाजीपाला पीक घेतले जाते. यामध्ये पोपटीसाठी लागणाऱ्या वालाचाही समावेश असतो.

रब्बीतील पेरणीसाठी आधी मशागतीची कामे केली जातात. या हंगामात जिथे बारमाही पाणी आहे तिथे दुबार शेती केली जाते. याशिवाय वाल, हरभरे, मुग, मटकी, चवळी या कडधान्यांची लागवड केली जाते. त्याचप्रमाणे टोमॅटो, कोथिंबिर, वांगी, मिरची, भेंडीचेही उत्पादन घेतले जाते. वाल पेरणीसाठी शेतकरी स्व:कडील स्थानिक जातीच्या बियाण्याचा वापर केला जातो. त्याचबरोबर कलिंगडाचेही मोठ्या प्रमाणावर पिक घेतले जाते. यासाठी अळी करणे, सरी वरंबा करणे इत्यादी मशागतीची कामे चालू आहेत. त्याचप्रमाणे जमिनीची नागंरणी, जमीन भुसभुशीत करण्याच्या कामास वेग आला आहे.

**वाल, कलिंगडातून मोठे उत्पन्न**

वालाची प्रामुख्याने पोपटीसाठी त्याचप्रमाणे कडधान्य म्हणूनही मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने शेतकऱ्यांकडून जोडधंदा म्हणून शेतात हे पीक घेतले जाते. हिवाळ्यात थंडी व दवामुळे जमीन ओली होत असल्याने पिकाला त्याचा फायदा होतो. या दवामुळे वाल, कलिंगडाला मोठ्या प्रमाणात पोषक द्रव्य जमिनीतून मिळते. यातून हंगामी चांगला रोजगार मिळत असल्याने शेतकऱ्यांकडून आवर्जून लागवड केली जाते.

# पटोले-शेळके वाद आता दिल्ली दरबारी!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि युवक काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव तथा मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघाचे पराभूत उमेदवार बंटी शेळके यांच्यातील वाद आता दिल्लीत पोहचला आहे. कारणे दाखवा नोटीसला उत्तर देण्यासाठी शेळके यांनी काँग्रेसचे प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथाला यांची भेट घेतली. ते राहूल गांधी यांचीसुद्धा भेट घेऊन आपल्या विरोधात कोणी आणि कसे काम केले याचे पुरावे सादर करणार आहेत. त्यामुळे अनेकांचे धाबे दाणाणले आहेत.

बंटी शेळके यांनी आपल्या पराभवासाठी पटोले हेच जबाबदार असल्याचा आरोप त्यांच्यावर केला होता. त्यांना कारणे दाखवा नोटीस बाजवण्यात आली आहे.

# अखिल भारतीय टेबल टेनिस स्पर्धेत स्वस्तिका घोष 'चॅम्पियन'

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय आंतर संस्थात्मक टेबल टेनिस ५१व्या चॅम्पियनशिप स्पर्धेत टेबल टेनिसपटू व सीकेटी महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्वस्तिका संदीप घोष हिने एकेरी महिला गटात विजेतेपद पटकावले. विशेष म्हणजे तिने ऑलिम्पिक खेळाडू श्रीजा अकुला हिचा पराभव करत देदीप्यमान कामगिरी केली. या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन केले.

चंदीगड येथील पंजाब विद्यापीठ जिम्नॅशियम हॉलमध्ये झालेल्या या स्पर्धेत देशभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये खारघर टेबल टेनिस अकादमी आणि सीकेटी कॉलेज पनवेलची विद्यार्थिनी



असलेल्या स्वस्तिका घोषने भारतीय विमानतळ प्राधिकरणचे प्रतिनिधित्व केले. स्वस्तिका सध्या भारतात महिला गटात १४व्या, तर जागतिक रँकमध्ये १२८व्या स्थानी आहे. या स्पर्धेत स्वस्तिकाने तीन पदके जिंकली. महिला एकेरीत चॅम्पियन, दुहेरीत उपविजेतेपद आणि सांघिक स्पर्धेत कांस्यपदक मिळविले. स्वस्तिकाच्या नेतृत्वाखाली विमानतळ प्राधिकरण टीमने चमकदार कामगिरी करत या स्पर्धेत सर्वोच्च १२० गुण मिळवले. अंतिम फेरीत स्वस्तिकाने भारतातील रँक एक आणि जागतिक रँक २३ची ऑलिम्पियन खेळाडू श्रीजा अकुलाला ४-२ सेट स्कोअरने पराभूत केले आणि प्रथमच ती आंतर संस्थात्मक चॅम्पियन बनली. **(पान २ वर..)**

> **या विजेतेपदामुळे स्वस्तिकाची रँक सुधारण्यास आणि भारतीय संघात पुन्हा निवड होण्यास मदत झाली आहे. २०२१-२२मध्ये स्वस्तिका भारतात चौथ्या क्रमांकावर होती. तिने वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि वर्ल्डकपसाठी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले तसेच कॉमनवेल्थ इंडिया संघात पाचव्या क्रमांकाची खेळाडू ठरली आहे.**
>
> **-संदीप घोष, स्वस्तिकाचे वडील व प्रशिक्षक**

# यंदा थंडी कमी असणार?

## नोव्हेंबर महिना ठरला सर्वांत उष्ण




**मुंबई : प्रतिनिधी**

भारतात सध्या अनेक राज्यांमध्ये दिवस उष्णता आणि रात्री थंडी पडताना दिसत आहे, पण अजूनही डिसेंबर महिन्यात हवी तशी थंडीची स्थिती पाहायला मिळत नाहीये. संध्याकाळनंतर आणि सकाळच्या आधी थंडी अजूनही मर्यादित आहे, पण दिवसा कडक सूर्यप्रकाश पडतोय. २०२४चा नोव्हेंबर महिना हा १९०१ नंतर देशातील दुसरा सर्वात उष्ण नोव्हेंबर महिना ठरला आहे.

नोव्हेंबरमध्ये सरासरी कमाल तापमान २९.३७ अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे. मागच्या हंगामात २८.७५ अंश तापमानाची नोंद झाली होती. हवामान खात्याच्या माहितीनुसार डिसेंबरमध्ये हवामानाचे स्वरूप बदलेल अशी शक्यता आहे. थंडी आता सुरु होणार आहे, पण मागील वर्षांच्या तुलनेत यंदा थंडी कमी राहण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, थंडीच्या लाट जास्त दिवस नसेल.

नोव्हेंबर २०२४मध्ये देशातील अनेक भागात तापमान सामान्यपेक्षा खूपच जास्त राहिले. लोकांना उष्णेतेचा सामना करावा लागला. पण आता थंडीची प्रतीक्षा अजून लांबली आहे. हवामान तज्ज्ञ यांच्या मते, ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. त्याचाच परिणाम म्हणून उष्णता जाणवत आहे. डिसेंबरमध्ये कडाक्याची थंडी पडते, पण यंदा परिस्थिती काय असेल असा प्रश्न अनेकांना पडला आहे. अशातच फेंगल चक्रीवादळामुळे सध्या थंडी ओसरली.

डिसेंबरमध्ये तापमानात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे थंडी वाढणार आहे असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला, पण देशातील बहुतांश भागात किमान तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. पण यंदा कमी थंडीची लाट येण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान खात्याने सोमवारी माहिती दिली की, या वेळी थंडीची लाट कमी असेल. त्यांच्या अंदाजानुसार या वेळी थंडीच्या लाटेच्या दिवसांची संख्या नेहमीच्या पाच ते सहा दिवसांपेक्षा कमी असेल. आयएमडीचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले की, या मोसमात, दक्षिण द्वीपकल्पीय भारतातील बहुतांश भाग वगळता देशातील बहुतांश भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. जेथे कमाल तापमान सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.



## उरण रोडवर विद्युत उपकेंद्राजवळ आग

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल उरण रोडवरील विद्युत वितरण कंपनीच्या उपकेंद्राजवळील मोकळ्या जागेत लागलेली आग थोडक्यात आटोक्यात आणल्याने पनवेल अंधारात जाता जाता वाचले.

पनवेलमध्ये उरण नाका येथे महावितरण चे उपकेंद्र आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात जंगली झाडे वाढली आहेत. त्या उपकेंद्राच्या आवारात आजूबाजूचे नागरिक कचरादेखील टाकतात. उपकेंद्र असल्यामुळे भूमिगत विद्युत तारा देखील तेथून गेल्या आहेत. त्याठिकाणी अशाच मोकळ्या जागी कचरा टाकण्यात आला होता. अचानक या कचऱ्याजवळ आग लागली. ती आग वाढू लागली. या आगीने रौद्र रूप धारण करण्यापूर्वीच जागरूक नागरिकांनी महापालिकेच्या अग्निशमन दलाला संपर्क साधला. अग्निशमन दलाचे जवान काही क्षणातच या ठिकाणी पोहचले आणि आग आटोक्यात आणली.

ही आग आटोक्यात आणली नसती तर भूमिगत विद्युत तारांना आग लागली असती. त्यामुळे पूर्ण पनवेल शहर अंधारात जाण्याची शक्यता होती.

# मध्य रेल्वे महापरिनिर्वाण दिनानिमित्त १२ अतिरिक्त विशेष गाड्या चालवणार



**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रवाशांच्या सोयीसाठी ५/६.१२.२०२४च्या मध्यरात्री (गुरूवार-शुक्रवार मध्यरात्री) परळ-कल्याण आणि कुर्ला-पनवेल स्थानकांदरम्यान १२ अतिरिक्त उपनगरीय विशेष गाड्या चालवणार आहे.

या उपनगरीय विशेष गाड्या सर्व स्थानकांवर थांबणार आहेत. यामध्ये मेन लाइन- अप विशेषः- कल्याण- परळ विभाग कुर्ला-परळ विशेष कुर्ला येथून ००.४५ वाजता सुटेल आणि परळ येथे ०१.०५ वाजता पोहचेल.

कल्याण-परळ विशेष कल्याण येथून ०१.०० वाजता सुटेल आणि परळ येथे २.१५ वाजता पोहोचेल. ठाणे-परळ विशेष ठाणे येथून ०२.१० वाजता सुटेल आणि परळ येथे २.५५ वाजता पोहचेल.

मेन लाइन-डाऊन विशेषः- परळ- कल्याण विभाग परळ-ठाणे विशेष परळ येथून ०१.१५ वाजता सुटेल आणि ठाणे येथे १.५५ वाजता पोहचेल. परळ-कल्याण विशेष परळ येथून ०२.२५ वाजता सुटेल आणि कल्याण येथे ३.४० वाजता पोहचेल.

परळ-कुर्ला विशेष परळ येथून ०३.०५ वाजता सुटेल आणि कुर्ला येथे ३.२० वाजता पोहचेल. हार्बर लाइन - अप विशेषः- पनवेल - कुर्ला विभाग वाशी-कुर्ला विशेष वाशी येथून ०१.३० वाजता सुटेल आणि कुर्ला येथे ०२.१० वाजता पोहचेल.

पनवेल-कुर्ला विशेष पनवेल येथून ०१.४० वाजता सुटेल आणि कुर्ला येथे ०२.४५ वाजता पोहचेल. वाशी-कुर्ला विशेष वाशी येथून ०३.१० वाजता सुटेल आणि कुर्ला येथे ०३.४० वाजता पोहोचेल. हार्बर लाईन - डाऊन विशेष - कुर्ला - पनवेल विभाग

कुर्ला-वाशी विशेष कुर्ला येथून ०२.३० वाजता सुटेल आणि वाशी येथे ०३.०० वाजता पोहोचेल. कुर्ला-पनवेल विशेष कुर्ला येथून ०३.०० वाजता सुटेल आणि पनवेल येथे ०४.०० वाजता पोहोचेल. कुर्ला-वाशी विशेष कुर्ला येथून ०४.०० वाजता सुटेल आणि वाशी येथे ०४.३५ वाजता पोहचेल.

सर्व प्रवाशांनी याची नोंद घ्यावी व सुविधेचा लाभ घ्यावा. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी योग्य तिकीट काढून प्रवास करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# रब्बी हंगामासाठी पीक स्पर्धा; ३१ डिसेंबरपर्यंत अर्जाचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिकस्पर्धा रब्बी हंगाम २०२४साठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

पिकस्पर्धा मागील वर्षाप्रमाणे तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येत आहेत. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पाच पिकांसाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

**पीकस्पर्धेतील पीके**

रब्बी पीके - ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस (एकूण ०५ पिके) स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल. पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास), पिक स्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा अर्जासोबत सादर करावा.

रब्बी हंगामामध्ये ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर आहे. तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावरील पिकस्पर्धा निकाल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम ३०० रुपये राहील व आदिवासी गटासाठी रक्कम १५० रुपये राहील. तालुका पातळी : पहिले बक्षिस पाच हजार रुपये, दुसरे बक्षिस ३ हजार रुपये, तिसरे बक्षिस दोन हजार रुपये. जिल्हा पातळी : पहिले बक्षिस १० हजार रुपये, दुसरे बक्षिस सात हजार रुपये, तिसरे बक्षिस पाच हजार रुपये राज्य पातळी : पहिले बक्षिस ५० हजार रुपये, दुसरे बक्षिस ४० हजार रुपये, तिसरे बक्षिस ३० हजार रुपये

नमूद पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पिकस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. पिकस्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी शेतकरी बंधुभगिनींनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in ला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी खालील QR कोड स्कॅन करावा.

## उद्यापासून रंगणार धीरूभाई माणगाव फेस्टिव्हल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात मुंबई-गोवा महामार्गालगत गांधी मैदान नाणोरे फाटा येथील पेट्रोल पंपाशेजारी भव्य मैदानावर ५ ते १५ डिसेंबर २०२४ पर्यंत धीरूभाई माणगाव फेस्टिव्हल २०२४चे आयोजन दररोज सायंकाळी ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत दिमाखदार पद्धतीने आकर्षक स्वरूपात करण्यात आले आहे. या महोत्सवाचा लाभ नागरिकांनी जरूर घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

माणगावात दरवर्षी होणारा माणगाव फेस्टिव्हल माणगावकरांना एक विरंगुळा मिळावा व त्यांना आनंद लुटता यावा यासाठी धीरूभाई माणगाव फेस्टिव्हल २०२४चे आयोजन माणगावात करण्यात आले आहे. या फेस्टिव्हलमध्ये एम्युझमेंट पार्क, विविध वस्तूंच्या स्टॉलचा मेळा, खाद्यपदार्थांची लयलूट, गमतीदार खेळांचे स्टॉल्स,दु चारी व चार चाकी गाड्यांचा लोन मेळा असणार असून विविध मनोरंजनाचे कार्यक्रम हि असणार आहेत. या फेस्टिव्हलमध्ये दि.१० डिसेंबर रोजी महाराष्ट्रात गाजलेली लावणी सम्राज्ञी गौतमी पाटील उपस्थित राहून नागरिकांचे मनोरंजन करणार असल्याने हे विशेष आकर्षण आहे.

या फेस्टिव्हलमध्ये धीरूभाई माणगाव फेस्टिव्हलचे बेस्ट रीळ बनवणाऱ्यास १५ डिसेंबरला आकर्षक बक्षीस दिले जाणार आहे. यासाठी rajlaxmimobile0303@gmail.com या मेलवर व्हिडीओ पाठविणे किंवा (८४८२९४४७६६) या नंबरवर पाठवावा. फेस्टिव्हलमध्ये स्टॉल बुकिंगसाठी हितेन छेडा (७७४१०९१५२४), (९१५६९९७६९५), पांडेजी (७५६४९०९०९१), (९०९६३५५५४१), निशू सावंत (७४४७६६०६०६) यांच्याकडे संपर्क साधावा. या महोत्सवाचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजक हितेनशेट छेडा व सहकाऱ्यांनी केले आहे.

## तेजज्ञान फाउंडेशनतर्फे रविवारी ध्यान महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'हॅपी थॉट्स' नावाने ओळखली जाणारी तेजज्ञान ग्लोबल फाउंडेशन ही आध्यात्मिक सेवाभावी संस्था आपल्या स्थापना दिनाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात प्रवेश करत आहे. त्यामुळे फाउंडेशनतर्फे रविवारी (दि.८) सकाळी १० ते १२ या वेळेत पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक संघ येथे 'रजत जयंती ध्यान महोत्सव' (सिल्व्हर ज्युबिली सेलिब्रेशन) आयोजित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, निवृत्त लेफ्टनंट कर्नल डॉ योगेश्वर दयाळ कौशिक, जिम्नॅस्टिक फेडरेशन ऑफ इंडियाचे टेकनिकल कमिटी चेअरमन पवन भोई यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक तेजगुरु सरश्री यांनी जीवनात ध्यान व आध्यात्मिक साधनेचे महत्त्व पटवून देत लाखो लोकांच्या जीवनात आनंद आणि शांती निर्माण केली आहे. अधिक माहितीसाठी ९९३०४१८७७०/९८६७००९५४३ ई-मेलः pradnyakolwankar@yahoo.com व वेबसाइटः www.happythoughts.global येथे संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या पत्रकारांना दरवर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरवण्यात येते. सन २०२३-२०२४ च्या उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारकरिता आपली नामांकने व शिफारशी येत्या २५ डिसेंबर २०२४ पूर्वी पुढील पत्त्यावर पाठवावीत, असे आवाहन मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने करण्यात आले आहेत.

जीवनगौरव पुरस्कार - (राज्यस्तरीय)- एक, उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार (राज्यस्तरीय) - वृत्तपत्र प्रतिनिधी- एक, वृत्तवाहिनी माध्यम प्रतिनिधी पुरस्कार -एक, आणि उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार (केवळ मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सदस्यांकारिता ) एक, अशा एकूण चार पुरस्कारांचा समावेश आहे.

कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कार - ज्येष्ठ पत्रकारांचे पत्रकारितेतील योगदान किमान २५ वर्षे असावे. त्यांचे वय ६० वर्षे पूर्ण असावे. पत्रकाराने राज्यस्तरावर पत्रकारिता क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य पाहून पुरस्कारासाठी निवड केली जाईल. तसेच राज्यातील पत्रकार, विविध पत्रकार संघटना व अन्य मान्यवर व्यक्ती यांच्या शिफारशीही विचारात घेण्यात येतील.

राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार (दोन) - हा पुरस्कार वृत्तपत्र प्रतिनिधी व वृत्तवाहिनी माध्यम प्रतिनिधी यांना प्रत्येकी एक याप्रमाणे देण्यात येतो. पत्रकारितेत पूर्णवेळ सेवा बंधनकारक आहे. यामध्ये पत्रकारांना भाषेचे बंधन राहणार नाही. वृत्तपत्र माध्यम प्रतिनिधीना मागील दोन वर्षांच्या बातम्या /लेख यांची कात्रणं, तर वृत्तवाहिनी माध्यम प्रतिनिधीना चित्रफित /ध्वनीफित (सी. डी. अथवा पेनड्राईव्ह) देणे बंधनकारक राहील. यावर अर्जदारांचे नाव तसेच संपादक किंवा संस्थेचे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडून प्रवेशिका सांक्षाकित केलेली असावी.

उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार (एक) - या पुरस्कारासाठी केवळ मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सदस्यांनाच सहभाग घेता येईल. अर्जदाराने दि. १ जानेवारी २०२३ पासून ते अर्ज करण्याच्या दिनांकपर्यत कात्रणे/ध्वनीफित / चित्रफीतसह प्रवेशिका द्याव्यात.

पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पत्रकारांनी आपल्या नामांकनाच्या प्रवेशिका अन्यथा मान्यवरांच्या शिफारशी तपशीलवार माहितीसह पुढील पत्त्यावर येत्या २५ डिसेंबर २०२४ पर्यंत पाठवण्यात याव्यात. चारही पुरस्कार निवडताना पुरस्कार निवड समितीचा निर्णय अंतिम राहील

प्रवेशिका पाठविण्याचा पत्ता मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, तळमजला, पत्रकार कक्ष, मंत्रालय, मुंबई ४०००३२ किंवा mahamantralaya@gmail.Com, असे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे व सरचिटणीस प्रवीण पुरो यांनी सांगितले आहे.

पान १ वरुन

### श्रीवर्धनमधील वृद्धाची हत्या संपत्तीच्या लालसेतून

यानुसार या महिलेने रामदास यांच्याशी संपर्क साधून त्यांचा विश्वास संपादन केला. नंतर काही दिवस त्यांच्यासोबत श्रीवर्धन येथे येऊन राहिली आणि लग्नाचे अमिष दाखवून दागिने व पैसे घेऊन पसार झाली.

रामदास यांनी पैसे आणि दागिने परत करण्यासाठी महिलेकडे मागणी सुरू केल्याने रामदास यांची हत्या करण्याचा कट रचला गेला. यासाठी तिने पतीची मदत घेतली. सुरुवातीला जेवणात किटकनाशक टाकून त्यांना झोपवले. नंतर दोघांनी मिळून रामदास झोपेत असताना त्यांची हत्या केली. यानंतर घरातील मौल्यवान वस्तू घेऊन पसार झाले. पोलिसांनी तपास कौशल्याच्या जोरावर दोघांना पकडले आणि श्रीवर्धन पोलीसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे करीत आहेत.

### अखिल भारतीय टेबल टेनिस स्पर्धेत स्वस्तिका घोष 'चॅम्पियन'

या आंतर संस्थात्मक टीटी चॅम्पियनशिपबरोबरच स्वस्तिकाने हरियाणा पंचकुला येथे १६ ते २२ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय मानांकन टेबल टेनिस चॅम्पियनशिप नॉर्थ झोन स्पर्धेत आणखी एक महत्त्वाचे कांस्यपदक जिंकले. त्यामुळे एकूणच स्वस्तिकाने यशाची घोडदौड सुरू ठेवली असून या स्पर्धा तिला आत्मविश्वास देणारे ठरले आहे.

### रेल्वेची धडक लागून एकाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे तेजस एक्सप्रेस रेल्वेची धडक लागून अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, मंगळवारी (दि.३) सकाळी ९ वा.च्या सुमारास कोकण रेल्वे मार्गावरील स्टोन क्र. ३१/१ ते ३१/२ मध्ये डाऊन मार्गावर रेल्वे रूळावरती प्लास्टिक बाटल्या उचलत असताना तेजस एक्सप्रेस ट्रेन क्र. २२११९ ची अनोळखी इसमास ठोकर लागून मयत याच्या डोक्यास तसेच दोन्ही हातापायाला, शरीराला गंभीर दुखापत होऊन शरीराचे तुकडे झाले.

या अपघाताची नोंद माणगांव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राठोड करीत आहेत.

## उरणमध्ये तिसरी घंटा वाजणार

**उरण : वार्ताहर**

समृद्ध रंगभूमीची परंपरा लाभलेल्या उरण तालुक्यात नाट्य सादरीकरणाचे वारे वाहू लागले असून, लवकरच तिसरी घंटा होऊन, नाटकाचा पडदा उघडणार आहे.

तालुक्यातील अष्टगंध कला मंचाच्या वतीने आगरी पेठा या नाटकाचे सादरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती माहिती सूत्रांकडून उपलब्ध झाली आहे. आगरी पेठा हि नाट्यकलाकृती नाटककार रंजन कान्हा ठाकूर यांच्या लेखणीतून उतरली आहे. तर या नाटकाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी नाटककार धनेश्वर म्हात्रे यांच्यावर सोपाविली असून, त्यांनी या नाट्य कलाकृतीचे दिग्दर्शन करण्याला होकार दिला आहे. सहदिग्दर्शनाची मदत नाटककार हसुराम पाटील करणार असल्याची माहितीही मिळाली आहे.

आगरी रूढी परंपरेवर हे नाटक आधारित असून, आगरी बोलीभाषेचा गोडवा आणि तेवढाच तिखटपणा या आकृतीबंध नाटकातून प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे.

या नाटकात अशोक म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, चेतन पाटील, नवनीत माळी, जयकिसन मोकल, दिगंबर कोळी, प्रसाद कडू, रोशन घरत, परीशा सरोदे, वैशाली मोहिते, रुचिता म्हात्रे आदी कलाकार भूमिका बजावणार असून, त्यांच्या भूमिकांमधून त्यांच्या अभिनयाच्या छटा पहावयास मिळणार आहेत.



**दुखवटा**

### अयोध्या शिवकर



**उरण :** प्रसिद्ध लेखक, कवी, पत्रकार अजय शिवकर यांच्या मातोश्री अयोध्या गणेश शिवकर (वय ७६) यांचे सोमवारी (दि.२) निधन झाले. त्यांच्या पश्चात, मुले, मुली, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी केळवणे स्मशानभूमी येथे झाला. या वेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. दशक्रिया विधी गुरुवारी (दि.१२) सकाळी ७:३० वाजता उरण माणकेश्वर येथे होणार आहे तर उत्तरकार्य शुक्रवारी (दि.१३) राहत्या घरी होणार आहे, असे त्यांच्या कुटुंबियांनी कळविले आहे.

### सुनील पावडे



**मुंबई :** महावितरणचे कार्यकारी संचालक (प्रकल्प) सुनील रंगनाथ पावडे (वय ५४) यांचे सोमवारी रात्री जळगाव येथे निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर पारनेर (जि. अहिल्यानगर) तालुक्यातील दरोडी या त्यांच्या मूळ गावी बुधवारी (दि. ४) सकाळी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी निशिगंधा, मुलगी मृणाल व मुलगा सोहम असा परिवार आहे. अत्यंत कर्तव्यनिष्ठ व शिस्तप्रिय अभियंता अशी सुनील पावडे यांची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे महावितरणच्या वर्तुळात शोक व्यक्त केला जात आहे. त्यांना महावितरणच्या सांघिक कार्यालयात श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

# पीरवाडी समुद्र किनाऱ्याची धूप सुरूच

## बंदिस्तीचे दगड लाटांनी निखळू लागले ▌ पर्यटकांचे अपघात होण्याची भिती

**उरण : प्रतिनिधी**

किनाऱ्याची धूप व सुरू असलेली दुरवस्था थांबविण्यासाठी बांधण्यात आलेल्या पीरवाडी समुद्र किनाऱ्यावरील बंधाऱ्याचे मोठमोठे दगड पुन्हा एकदा निखळू लागले आहेत. त्यामुळे बंदिस्ती मधील मोठमोठे दगड समुद्रात कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाळ्यात येणाऱ्या महाकाय समुद्राच्या लाटांमुळे पीरवाडी किनारा पुन्हा उद्ध्वस्त होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पर्यटकांनी सावधानता बाळगण्याची गरज आहे.



नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील पर्यटकांसाठी आकर्षण ठरत असलेल्या उरणच्या पिरवाडी किनाऱ्यावरील पर्यटकांमध्ये दिवसेंदिवस वाढ होऊ लागली आहे. सुट्टीच्या दिवशी तर प्रचंड गर्दी होत आहे. त्याचप्रमाणे या किनाऱ्यावर ओएनजीसी सारखा महत्वाचा तेल शुद्धीकरण प्रकल्प व नागावमधील लोकवस्ती आहे. मागील अनेक वर्षात पावसाळ्यात येणाऱ्या समुद्राच्या प्रचंड लाटांमुळे पिरवाडी किनाऱ्यावरील धूप वाढली होती. त्यामुळे येथील नारळी, फोफळीची वृक्ष उखडून निघत होती. त्याचप्रमाणे समुद्राचे पाणी नागाव परिसरात शिरत होते. परिणामी येथील विहीरीतील पिण्याचे पाणी व शेतीत ही समुद्राचे खारे पाणी येऊ लागल्याने समस्या निर्माण झाली होती.

ही समस्या दूर करण्यासाठी पिरवाडी किनाऱ्यावरील बंदिस्ती मजबूत करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली. याची दखल घेत सार्वजनिक बांधकामच्या किनारा विभागाने या किनाऱ्यावरील मजबूतीसाठी मोठमोठे दगड किनाऱ्यावर टाकून बंदिस्ती केली आहे, मात्र यातील अनेक दगड हळूहळू निखळू लागले आहेत. पावसाळ्यात येणाऱ्या मोठया लाटांमुळे यात वाढ झाली आहे. त्यामुळे किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांना ही अपघात होण्याची शक्यता आहे. पीरवाडी किनाऱ्यावरील बंदिस्तीचे दगड निखळू नये या करीता उपाययोजना करण्याची मागणी येथील नागरीकांनी केली आहे.

> **पीरवाडीचा समुद्रकिनारा निखळत असल्याने येथे होणारी कामे योग्य पद्धतीने व्हावीत जेणेकरून कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाही पुरवाडी समुद्रकिनारी लाटांचा फोर्स इतका मोठ्या प्रमाणात येत असल्याने दगड निखळत आहेत ही काम व्यवस्थित झाली नाही तर भविष्यात हे पाणी नागाव व आजूबाजूच्या गाव तसेच उरण शहरात देखील येऊ शकते.**
>
> **-संतोष पवार, सरचिटणीस, उरण संघर्ष समिती**

# दीड लाख मुला-मुलींना पनवेल मनपा देणार जंतनाशक गोळ्या

## राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १ ते १९ वर्ष वयोगटातील एक लाख ५० हजार ७०५ मुला-मुलींना बुधवारी (दि.४) जंतनाशक गोळ्या देण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत २६८ शाळा, १४८ अंगणवाड्यांमधून जंतनाशक गोळ्या देण्याचे नियोजन आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

जंतदोषामुळे बालकांमध्ये ऍनिमियाचा सर्वाधिक धोका उद्भवतो शिवाय आतड्यांना सूज येणे, पोटदुखी, भूक मंदावणे, उलट्या, अतिसार तसेच इतर आजार उद्भवतात. या आजारांना आळा घालण्यासाठी वर्षातून दोन वेळा बालकांनी जंतनाशक गोळी घेणे गरजेचे आहे. ज्या मुलामुलींना कोणत्याही कारणाने ४ डिसेंबर रोजी जंतनाशक गोळी मिळाली नाही तर, त्यांना १० डिसेंबर रोजी मॉप-अप राऊंडच्या वेळी गोळी देण्यात येणार आहे.

एक वर्ष आतील बालकांना गोळी देण्यात येऊ नये, १ वर्ष ते २ वर्ष वयोगटातील बालकांना अर्धी गोळी पावडर करून पाण्यातून देण्यात यावी, २ ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना एक गोळी पावडर करून पाण्यातून देण्यात यावी तसेच २ ते १९ वयोगटातील मुलांनी एक गोळी चावून खाल्यानंतर त्यांना पाणी द्यावे, अशा सूचनाही संबंधितांना देण्यात आल्या आहेत. तरी या मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

पनवेल महापालिकेच्या वतीने वैद्यकियआरोग्य विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत अंगणवाड्यांमधील मुले, सर्व शासकीय शाळेचे विद्यार्थी, शासकिय अनुदानित-विनाअनुदानित शाळेचे विद्यार्थी, महापालिका शाळेतील विद्यार्थी, सर्व कनिष्ठ विद्यालये, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी या सर्वांना जंत नाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

## निवडक



### पिरकोन येथे हुतात्मा दिन

**उरण :** तालुक्यातील पिरकोन येथील पंचरत्न अध्यापक इंग्लिश स्कूल पिरकोन येथे मंगळवारी (दि.३)हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. हुतात्म्यांना सर्व मान्यवर, शाळेतील शिक्षक आणि शाळेतील लहान मुलांनी मानवंदना दिली. हुतात्मा वसंत धर्मा गावंड, अशोक रामभाऊ गावंड, शंकर पांडुरंग जोशी, गणपत महादेव गावंड, हरीभाऊ नामाजी गावंड ह्या नावाने सभागृह दणाणून गेले.

### साईबाबा प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन

**पनवेल :** श्री साई नारायण बाबा यांच्या कृपाशीर्वादाने श्री साईबाबा प्राणप्रतिष्ठा २३वा वर्धापन दिन सोहळा बुधवारी (दि.४) नेरे, साई मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. या वेळी पहाटे ५ ते सकाळी ९ वाजेपर्यंत साईबाबांची काकड आरती, अभिषेक व महिमा पारायण, सकाळी ९ ते ११ वाजता सत्यनारायणाची पूजा, दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत भजन, दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत भजन पहिली बारी आणि सायंकाळी ४ ते ६ वाजेपर्यंत दुसरी बारी भजन करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत साई पालखी सोहळा व महाआरती ते रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



**उलवे : येथील रहिवासी संघटनेचे अध्यक्ष अवधेश महतो यांच्या वतीने सिडकोच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी उलवे नोडमधील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार समस्या सोडविण्याबाबत सिडकोच्या अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन देण्यात आले. या वेळी ॲड. सुनील मौर्य, संकल्प घरत, कुलदीप तिवारी, अवनिश सिंग, डेबलोय मित्रा, राम शुक्ला, उदय पांडे, अर्चना चौहान, अंजली मिश्रा, रचना बाथम, प्रिती चांडेल आदी उपस्थित होते.**

# तळोजा डोंगरात अडकलेल्यांची सुटका

**पनवेल : वार्ताहर**



तळोजा कारागृह शेजारील डोंगरावर वरळी येथून ट्रेकिंगसाठी आलेले तिघेजण रस्ता चुकल्यामुळे खोल दरीत अडकले होते. या पर्यटकांना पोलीस, अग्निशमन जवान आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने वाचवले.

वरळी दादर येथील संजय धवल त्यांच्या दोन सहकाऱ्यांसह रविवार सकाळी नऊच्या सुमारास तळोजा मध्यवर्ती कारागृहाच्या मागे असलेल्या डोंगरावर ट्रेकिंगसाठी गेले होते. ट्रेकिंग करताना वाढलेले गवत आणि झाडाझुडूपांमुळे तिघेही भरकटले. बाहेर पडण्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. मात्र, बऱ्याच प्रयत्नानंतरही कसोशीनेही यश मिळाले नसल्याने नातेवाइकांना संपर्क साधला होता. या वेळी खारघर परिसरातील पर्यटकांनी साडेदहाच्या सुमारास नवी मुंबई पोलिसांशी हेल्पलाईनद्वारे संपर्क करत पर्यटकांची माहिती दिली होती. सेक्टर ३५ मध्ये वास्तव्यास असलेल्या पर्यावरण प्रेमी ज्योती नाडकर्णी यांनी सहकाऱ्याच्या मदतीने डोंगरावर रोप लागवड केली आहे. नाडकर्णी यांना याबाबतची माहिती मिळताच झाडांची देखभाल करणाऱ्या कामगारांना त्यांनी माहिती दिली. झाडांच्या सभोवताली लावलेल्या नेटचा आधार घेत कामगारांनी तिघांना बाहेर काढले. खारघर अग्निशमन केंद्राचे जवानांसह पोलीसदेखील उपस्थित होते.

# खारघरमध्ये नाल्यात कोसळली गाडी



**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहतीमधील सेक्टर ६ येथे असलेल्या एका नाल्यात वाहन चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने सदर मारुती सुझुकी इर्टीगा गाडी नाल्यात पडल्याची घटना घडली आहे.

खारघर सेक्टर ६ स्टेशन रोडकडे जाणाऱ्या मार्गावरील प्रणाम हॉटेल समोर असलेल्या नाल्यात मुख्य रस्ता सोडून वाहन चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने ही गाडी नाल्यात कोसळली असून यात गाडीचे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही.



**पनवेल : विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजयाचा चौकार लगावला आहे. या विजयात महत्त्वपूर्ण योगदान देणारे भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे अनेकांनी अभिनंदन केले.**



















उरण : विधानसभा निवडणुकीत सलग दुसऱ्यांदा विजय मिळविणारे आमदार महेश बालदी यांचे अनेकांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# भविष्यातील प्रश्न

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी समाजाचे अस्तित्व टिकवायचे असेल तर किमान तीन अपत्ये हवीत असे प्रतिपादन एका कार्यक्रमात केल्यानंतर समाजमाध्यमांवर यासंबंधी बरीच उलटसुलट टीका-टिप्पणी झाली. काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी तर निशाणाच साधला. वास्तविक लोकसंख्याविषयक महत्त्वाच्या बदलाकडे त्यांनी यानिमित्ताने लक्ष वेधले आहे.

**लोकसंख्या शास्त्रानुसार लोकसंख्या वाढीचा दर २.१पेक्षा कमी होऊ नये असे सांगितले जाते. त्यामुळे दोन किंवा तीन मुलांपेक्षा कमी मुले झाली तर समाजाचे अस्तित्व टिकणार नाही अशी चिंता व्यक्त करीत सरसंघचालक मोहन भागवत यांनी किमान दोन ते तीन अपत्ये असावीत असा सल्ला दिला. त्यांनी नमूद केलेली माहिती बरोबरच आहे. सध्या भारताची लोकसंख्या वाढत असली तरी लोकसंख्यावाढीच्या दरात गेल्या काही वर्षांत बरीच घसरण झाली आहे. देशातील टोटल फर्टिलिटी रेट (टीएफआर) अर्थात मूल जन्माला घालण्याची क्षमता असलेल्या महिलांना मुले होण्याचा दर कमी होतो आहे. देश स्वतंत्र झाला त्या सुमारास म्हणजे १९५०मध्ये हा दर ६.१८ इतका होता. सध्या तो १.९१ इतका असल्याचे सांगितले जाते. हा दर २.१ इतका असल्यास लोकसंख्या कायम राहते असे लोकसंख्या शास्त्रात मानले जाते. हा दर २.१च्या खाली गेल्यास लोकसंख्या कमी होऊ लागते. या प्रश्नाकडेच सरसंघचालकांनी लक्ष वेधले आहे. अफाट लोकसंख्येच्या प्रश्नावर तोडगा म्हणून कठोर 'एक मूल' धोरण राबवणाऱ्या चीनमध्येही आता अधिक मुले होऊ देण्याकरिता नागरिकांना प्रोत्साहन दिले जाते आहे, परंतु धोरणात्मक बदलाने, प्रोत्साहनपर भत्ते जाहीर करूनही जनतेकडून त्या देशात या आवाहनास प्रतिसाद मिळालेला नाही. जगभरातील अनेक देशांमध्ये आजच्या घडीला लोकसंख्यावाढीचा दर कमी होतो आहे. युरोपातील बहुतेक देश, आशिया खंडातील जपानसारखा प्रगत देश, दक्षिण कोरिया या देशांमध्ये लोकसंख्येतील घट हा गंभीर प्रश्न गणला जातो. भारतात लोकसंख्यावाढीचा दर लक्षणीयरित्या कमी झाला असला तरी तूर्तास आपली लोकसंख्या वाढतेच आहे, पण लोकसंख्यावाढीचा दर यापुढेही घटतच जाईल असेही स्पष्ट दिसते. भारतासमोरची परिस्थिती अशी आहे की सध्या तरी आपल्यासमोर लोकसंख्यावाढीचीच समस्या मोठी आहे. आता आपली लोकसंख्या १४० कोटी असली तरी लवकरच आपण दीडशे कोटी होऊ. सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवण्यासोबतच पायाभूत सुविधा, आरोग्य सुविधा यांवरही अफाट लोकसंख्येमुळे ताण येतो. शिक्षण आणि बेरोजगारीचे प्रश्नही लोकसंख्येतूनच निर्माण होत आहेत, पण एकच किंवा फार फार तर दोन मुले होऊ देण्याची मानसिकता सध्या सर्वच समाजांमध्ये निर्माण होते आहे. मुली शिक्षित होत असल्यामुळे हा बदल होतो आहे. अधिकाधिक संख्येने स्त्रिया नोकरदार होत असल्यामुळे लग्नाचे वय वाढते आहे तसेच पहिले मूल होण्याचे वयही पुढे सरकते आहे. आपल्या अपत्याला अधिकाधिक चांगले शिक्षण व जीवनशैली देण्याकरिता दाम्पत्ये एकाच मुलाचा पर्याय निवडतात असे सर्वसाधारणपणे दिसते. हा दृष्टिकोन जगभरातच दिसतो. आरोग्यविषयक उत्तम सुविधांमुळे एकीकडे आयुर्मान वाढते आहे. त्यामुळे अनेक देशांना तरुणांची संख्या कमी व वृद्ध नागरिकांची लोकसंख्या मोठी असल्याच्या समस्येलाही तोंड द्यावे लागते आहे. येत्या काळात तंत्रज्ञानाच्या मदतीने वृद्धांनाही अधिक कार्यक्षम करून यावर तोडगा काढता येईल का, या दिशेनेही आता चर्चा सुरू आहे.**

# पराभवानंतर ईव्हीएमला विरोध अव्यवहार्य



ईव्हीएमवर होणारी टीका ही निव्वळ ढोंगीपणाच म्हटली पाहिजे. निवडणूक हरल्यानंतर ईव्हीएममध्ये छेडछाड होते, असे म्हणणे म्हणजे ढोंगीपणाच होय, असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरचा मतदानासाठी वापर करण्याची मागणी पुन्हा एकदा फेटाळली आहे.

निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन (ईव्हीएम)ऐवजी बॅलेट पेपर मतदानाचा वापर करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच फेटाळून लावली. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित महायुती सरकारने मिळवलेल्या देदीप्यमान यशामुळे विरोधक अस्वस्थ होऊन ईव्हीएमविरोधात पुन्हा एकदा राळ उडवत असताना, 'टेस्ला' आणि 'स्पेसएक्स'चे अब्जाधीश सीईओ एलॉन मस्क यांनी भारतातील निवडणूक यंत्रणेचे कौतुक केले आहे. भारताने एका दिवसात ६४ कोटी मतांची मोजणी कशी केली, अशा शब्दांत त्यांनी भारतीय यंत्रणेचे कौतुक केले आहे. अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्रातील कॅलिफोर्नियात अद्याप मतमोजणी सुरू आहे, हे त्या वेळी त्यांनी दाखवून दिले.

काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी भारतातील ईव्हीएम मशिनवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या नेत्यांनी तर महाराष्ट्रातील जनतेने दिलेला हा जनादेश जनतेचा नाहीच, असा अतर्क्य दावा केला. हे अत्यंत स्वाभाविक असेच. काँग्रेस आणि महाविकास आघाडीला एकत्रित मिळूनही ५० जागा महाराष्ट्रात न मिळाल्याने त्यांना असे वाटले, तर त्यात त्यांची काहीही चूक नाही. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी त्यासाठी लोकसभा निकालाचे तर्कट लावले आहे. लोकसभेला आम्हाला ज्या मतदारसंघात इतकी मते मिळाली, तेथे आमच्या विरोधात कसा निकाल लागू शकतो, असा त्यांचा प्रश्न. अर्थातच, विचार कसा करायचा, हाही ज्याचा त्याचा प्रश्न. भक्कम व स्थिर सरकार सत्तेत असावे याच भावनेतून राज्यातील जनतेने उत्स्फूर्तपणे मतदान करत महायुतीच्या पारड्यात भरघोस मते टाकली हे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या लक्षात आलेले नाही. किंबहुना, ते आले असले तरी पराभवाचे खापर हेतूतः ईव्हीएमवर फोडत आहेत, असेही म्हणता येते.

सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमबाबत जे भाष्य केले आहे, ते म्हणूनच योग्य असले तरी विरोधक किती वेळा सर्वोच्च न्यायालयात, त्याच त्याच मागणीसाठी जाणार, हाही प्रश्न आहे. यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दात मतपत्रिकांचा वापर करण्यास नकार दिला आहे.

मतपत्रिकेवर मतदान घेतल्याने काय होते, ते आम्ही अद्याप विसरलेलो नाहीत, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने मतपत्रिकेचा वापर करण्याची शक्यता फेटाळून लावली होती. ईव्हीएमविरोधात अनेकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून त्यांची एकत्रित सुनावणी असताना न्यायसंस्थेने ईव्हीएमसाठी कोणता पर्याय तुमच्याकडे आहे, असे याचिकाकर्त्यांना विचारले असता, त्यांनी मतपत्रिका म्हणून सांगितले. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत त्याला विरोध केला. मतपत्रिका असताना देशात कशा पद्धतीने मतदानाची प्रक्रिया कशी होत होती याचे स्मरण सर्वोच्च न्यायालयाने करून दिले.

युरोपीय देशांमध्ये काय होते, ते इथे सांगू नका. भारतातील निवडणुका घेणे हे एक मोठे काम असून जर्मनीच्या लोकसंख्येपेक्षा एकट्या पश्चिम बंगालची लोकसंख्या जास्त आहे. भारतात ९७ कोटी मतदार आहेत, याकडेही न्यायालयाने लक्ष वेधले होते. जेव्हा इतक्या मोठ्या संख्येने मतदार आपला हक्क बजावत असतील, तर एकावर विश्वास ठेवणे क्रमप्राप्त आहे. म्हणूनच ईव्हीएमवर शंका घेऊ नका, अशी टिप्पणीही सर्वोच्च न्यायालयाने केली होती.

याचिकाकर्त्यांनी असा आक्षेप घेतला होता की, ईव्हीएममध्ये फेरफार केला जाऊ शकतो. म्हणूनच व्हीव्हीपॅटमधील सर्व स्लिपची मोजणी करायची मागणी त्यांनी केली आहे. अर्थातच, ती अमान्य करण्यात आली. त्यासाठी १२ दिवस लागतील असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले तसेच व्हीव्हीपॅटसंदर्भात जे आक्षेप नोंदवण्यात आले, तेही अमान्य करण्यात आले. मतदाराला त्याच्या मताची कागदी पोच द्यायची मागणीही फेटाळण्यात आली. भारतातील मतदारांची संख्या पाहता केवळ दहा टक्के मतदारांनी जरी अशी मागणी केली, तरी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ठप्प होऊ शकते, असे सांगत न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सुनावले होते.

प्रत्येकवेळी निवडणुका आल्या की, विरोधक ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात तसेच त्यात फेरफार केला जाऊ शकतो, असा आरोप करतात, मात्र जेव्हा निवडणूक आयोग हा आरोप सिद्ध करण्याचे आव्हान देते, त्या वेळी न्यायालयात धाव घेणाऱ्या सर्व संस्था, राजकीय पक्ष गप्प बसतात. अमेरिका आणि युरोपमध्ये कागदी मतपत्रिकांचा वापर आजही केला जातो, हा आणखी एक त्यांचा आक्षेप. तथापि, तेथील लोकसंख्येच्या प्रमाणात भारताची लोकसंख्या याचे प्रमाण पाहिले, तर ईव्हीए हा सर्वोत्तम पर्याय. व्हीव्हीपॅट हा मतदाराला त्याने कोणाला मत दिले हे कागदावर दाखवणारा पर्याय आहे. म्हणून मतपत्रिका नसतील, तर या कागदी पर्यायांची मोजणी करा ही मागणी अव्यवहार्यच. याचीही पूर्ण कल्पना याचिकाकर्त्यांना असणार. म्हणूनच ते अशा पर्यायांची मागणी करू पाहत आहेत, जेणेकरून भारतातील निवडणूक प्रक्रिया अडचणीत यावी, मात्र सर्वोच्च न्यायालयाने कानउघाडणी केल्यानंतर ईव्हीएम विरोधकांच्या भूमिकेत काही बदल झालेला दिसत नाही.

विशेष म्हणजे ईव्हीएम हे केंद्रातील सत्ताधारी भाजपने वापरात आणले नाही, तर काँग्रेसी कार्यकाळातच ईव्हीएमचा वापर सुरू झाला. देशातील कोट्यवधी मतदारांची संख्या लक्षात घेऊन ईव्हीएम प्रत्यक्षात आणले गेले. १९८२ साली त्याचा सर्वप्रथम वापर केला गेला होता. १९६० सालच्या दशकात निवडणुकीतील गैरप्रकार सर्वप्रथम बिहारमध्ये दिसून आले. त्यानंतर देशात सर्वत्रच असे प्रकार घडू लागल्याने ईव्हीएमची गरज भासत होती, ती आयोगाने पूर्ण केली हे विसरता येणार नाही. मतदानादिवशी होणारे गैरव्यवहार, हिंसाचार हा निवडणूक आयोगासमोरील काळजीचा विषय होता. संपूर्ण मतदान केंद्रेही समाजविघातक शक्तींना हाताशी धरून ताब्यात घेतली जात होती. मतपत्रिकांचा पूर्ण गठ्ठाच हातात घेऊन या शक्ती बळजबरीने त्यांना हव्या त्या उमेदवाराच्या चिन्हावर शिक्का मारून मतपत्रिका मतपेट्यांमध्ये टाकत असत.

एखाद्या मतदानकेंद्रावर विरोधात मतदान झाले, तर तेथील मतपेट्याच पळवून नेल्या जात होत्या. या मतपेट्यांची वाहतूक आणि त्यांची सुरक्षा हा वेगळाच विषय होता. मतमोजणीच्या दिवशी अधिकाऱ्यांना हाताशी धरून, प्रसंगी दमदाटी करून चुकीची मतमोजणी केली जात असे. म्हणूनच ईव्हीएम आल्यानंतर अशा गैरप्रकारांना आळा बसला. समाजकंटकांना हाताशी धरून आपल्या नावाने मते टाकण्याची चुकीची पद्धत बंद झाली.

म्हणूनच ईव्हीएमविरोधात भूमिका घेतली जाते. विकाऊ माध्यमांना हाताशी धरून त्या विरोधात चुकीचे वार्तांकन करत सर्वसामान्य मतदारांना भ्रमित केले जाते. आताही महाराष्ट्रात तेच होत असून सर्वोच्च न्यायालयाने केलेली टिप्पणी ही योग्य अशीच आहे. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

### एअरटेलचा धमाकेदार प्लॅन; भरपूर डेटा, ओटीटी सबस्क्रिप्शन




सध्या दिवसभरातील अनेक कामे मोबाईलच्या मदतीने केली जातात. विद्यार्थ्यांच्या प्रकल्पासाठी माहिती शोधणे, कॉलेज प्रवेश घेण्यासाठी फॉर्म भरणे, ऑफिसची मिटिंग अटेंड करणे आदी अनेक गोष्टींसाठी आपण मोबाईलचा उपयोग करतो, पण या सगळ्यासाठी मोबाईलमध्ये नेट असणे गरजेचे असते. त्यामुळे एअरटेल, व्हीआय, जिओ या कंपन्या आपल्यासाठी नवनवीन रिचार्ज प्लॅन ऑफर करत असतात.

भारतातील दुसरी सर्वात मोठी दूरसंचार कंपनी एअरटेल विविध ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नवनवीन रिचार्ज प्लॅन घेऊन येत असते. कंपनी दीर्घकालीन वैधतेसह अनेक बजेट-फ्रेंडली रिचार्ज प्लॅन ऑफर करत असते. जर तुम्ही एअरटेल युजर असाल आणि तुम्हाला वारंवार रिचार्ज करणे आवडत नसेल, पण जास्त डेटा पाहिजे असेल तर तुम्ही कंपनीचा ८४ दिवसांचा प्लॅन घेण्याचा विचार करू शकता. या प्लॅनबरोबर तुम्हाला विनामूल्य ओटीटी सबस्क्रिप्शनसह भरपूर दैनिक डेटा दिला जाईल. सध्या मोबाईल कंपन्यांमध्ये स्पर्धा सुरू आहे. त्यातच बीएसएनएलचे प्लॅन परवडणारे आहेत. त्यामुळे इतरही कंपन्या काही बदल करीत असतात.

एअरटेलचा १,१९९ रुपयांचा प्लॅन

एअरटेलकडून हा प्लॅन तुमच्या सर्व दूरसंचार गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. यामध्ये तुम्हाला ८४ दिवसांची वैधता, सर्व नेटवर्कवर अमर्यादित कॉल आणि दररोज १०० मोफत एसएमएस, दररोज २.५ जीबीसह एकूण २१० जीबी डेटाचा आनंद घेता येऊ शकतो. दैनिक मर्यादा ओलांडली तरीही तुम्ही ६४झलीि गतीने इंटरनेट वापरू शकता.

का निवडावा हा प्लॅन?

एअरटेलचा हा प्लॅन स्वस्तात मस्त, दीर्घकालीन वैधता आणि प्रीमियम फायद्यांनी भरपूर आहे. भरपूर डेटा आणि विनामूल्य ओटीटी प्लॅटफॉर्ममध्ये ज्यांना प्रवेश हवा असेल त्यांच्यासाठी हा बेस्ट पर्याय ठरेल.

मोफत ओटीटी आणि इतर फायदे

हा प्लॅन ओटीटी पाहणाऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे, कारण यामध्ये मेझॉन प्राइम सबस्क्रिप्शन, विंक म्युझिक ॲक्सेस प्रवेश दिला जाईल.

# आज भारतीय नौदल दिन

१९७१मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध जिंकलेल्या भारतीय नौदलाचे सामर्थ्य आणि शौर्य लक्षात ठेवण्यासाठी दरवर्षी ४ डिसेंबर रोजी भारतीय नौदल दिन साजरा केला जातो.

४ डिसेंबर १९७१ रोजी 'ऑपरेशन ट्रायडंट' अंतर्गत भारतीय नौदलाने पाकिस्तानच्या कराची नौदल तळावर हल्ला केला. या ऑपरेशनचे यश लक्षात घेऊन दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. जंग-ए-आझादी, मुंबईतील ऑपरेशन ताजपासून ते इतर अनेक घटनांपर्यंत भारतीय नौदलाचा इतिहास कर्तृत्वाने भरलेला आहे.

नौदल ही भारतीय लष्कराची सागरी शाखा आहे, जी १६१२मध्ये स्थापन झाली. ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या जहाजांचे संरक्षण करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनी मरीन म्हणून एक सैन्य उभे केले, ज्याचे नंतर रॉयल इंडियन नेव्ही असे नामकरण करण्यात आले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९५०मध्ये नौदलाची पुनर्रचना करण्यात आली आणि तिचे भारतीय नौदल असे करण्यात आले.

या दिवशी अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले जातात आणि दरवर्षी नौदल दिन साजरा करण्यासाठी वेगळी थीम ठरवली जाते. नौदल दिन त्याचा इतिहास आणि त्याचे महत्त्व याबद्दल



निमित्त

अधिक जाणून घेऊयात.

जगातील पाचव्या क्रमांकाच्या या नौदलाने १९७१च्या बांगलादेश मुक्ती युद्धात पाकिस्तानच्या कराची बंदरावर जोरदार बॉम्बफेक करून उद्ध्वस्त केले. ४ डिसेंबर १९७१ रोजी ऑपरेशन ट्रायडंट नावाने सुरू करण्यात आलेल्या मोहिमेत मिळालेल्या यशामुळे दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. १९४५पासून दुसऱ्या महायुद्धानंतर १ डिसेंबरला नौदल दिन साजरा केला जात होता, मात्र नंतर तो १५ डिसेंबर १९७२पर्यंत साजरा करण्यात आला, त्यानंतर १९७२पासून फक्त ४ डिसेंबरला नौदल दिन साजरा केला जात आहे.

नौदल दिनाच्या दिवशी भारत-पाकिस्तान युद्धात मारले गेलेल्यांचे स्मरण केले जाते आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जाते. भारतीय नौदल ही भारतीय सशस्त्र दलांची नौदल शाखा आहे ज्याचे नेतृत्व भारताचे राष्ट्रपती कमांडर-इन-चीफ म्हणून करतात. मराठा सम्राट, छत्रपती शिवाजी महाराजांना भारतीय नौदलाचे जनक मानले जाते.

भारतीय नौदलाची स्थापना १६१२मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने केली होती. नंतर त्याला रॉयल इंडिया नेव्ही असे नाव देण्यात आले आणि स्वातंत्र्यानंतर १९५०मध्ये भारतीय नौदल म्हणून त्याची पुनर्रचना करण्यात आली. पाकिस्तानविरुद्धच्या विनाशकारी युद्धानंतर संपूर्ण देशाने भारतीय नौदलाच्या यशाचा जल्लोष साजरा केला.

भारतीय नौदलाची सुरुवात ईस्ट इंडियाच्या काळात झाल्याचं मानण्यात येतं. ईस्ट इंडिया कंपनीनं आपल्या व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी नौदलाची एक टीम तयार केली. नंतर याचं नामकरण रॉयल इंडियन नेव्ही असं करण्यात आलं. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९५० साली रॉयल इंडियन नेव्ही हे नाव बदलण्यात आलं आणि भारतीय नौदल अर्थाच इंडियन नेव्ही असं ठेवण्यात आलं, जे आपल्या देशाचे एक वैभव आहे. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!





**पनवेल : राजे अकॅडमी पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र, कामोठे यांची सहल कर्नाळा किल्ल्यावर गेली होती.** (छाया : सागर घोरपडे)

## आरोग्य प्रहर

### मुलांचे डोळे सुरक्षित ठेवण्यासाठी पाच गोष्टी



हल्ली मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप असं काहीही न बघणारे लहान मूल क्वचितच एखादं सापडेल. बहुतांश मुलांना मोबाईल, लॅपटॉप, टीव्ही या स्क्रीनचं अक्षरशः वेड लागलं आहे. उठल्या उठल्या आधी मोबाईल बघणारे आणि दिवसभर कामानिमित्त लॅपटॉपच्या स्क्रिनला चिटकून बसणारे, त्यानंतरही घरी आल्यावर टीव्ही पाहून रिलॅक्स होणारे पालक घरात असल्यावर मुलं वेगळं तरी काय करणार, पण लहान मुलांचे डोळे नाजूक असतात. त्यामुळे जास्त प्रमाणात स्क्रिन पाहिल्याने त्यांच्यामध्ये मायोपिया हा दृष्टीदोष वाढतो आहे, असं सांगणारा अहवाल एका अभ्यासात मांडण्यात आला आहे.

मायोपिया म्हणजे नेमकं काय?

मायोपिया हा दृष्टीशी संबंधित एक आजार असून यामध्ये मुलांना दुरचं दिसायला त्रास होतो. आधीच स्क्रीन बघण्याचं वाढलेलं प्रमाण, मैदानी खेळ न खेळणं आणि त्यात योग्य आहाराची कमतरता.

यामुळे हा आजार मुलांमध्ये खूपच वाढला आहे, असं या अभ्यासात सांगण्यात आलं असून २०५० पर्यंत तर हा आजार खूपच वाढणार असल्याचं नेत्रतज्ज्ञ सांगतात. पुस्तकं वाचताना किंवा लिखाण करताना काही मुलं पुस्तक डोळ्याच्या खूपच जवळ धरतात. यामुळेही डोळ्यांना हा त्रास होऊ शकतो.

काय काळजी घ्यावी?

मुलांना मायोपियाचा त्रास होऊ नये म्हणून पालकांनी मुलांची कशा पद्धतीने काळजी घ्यावी, याविषयी तज्ज्ञांनी सांगितलेल्या काही महत्त्वाच्या गोष्टी...

१. मुलांना काही त्रास होवो अथवा न होवो, पण दर सहा महिन्यांनी मुलांची डोळे तपासणी करायलाच पाहिजे.

२. मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी किंवा घराबाहेर पडून काहीतरी खेळण्यासाठी नेहमीच प्रोत्साहित करा.

३. मुलांचा स्क्रिनटाईम खूप मर्यादित करा, कारण हल्ली मुलांना टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप यापासून दूर ठेवताच येत नाही, पण त्यांचं गॅझेट्स बघण्याचं प्रमाण मर्यादित ठेवा.

४. डोकेदुखी, टीव्ही बघताना डोळे बारीक करून टीव्ही-मोबाईल बघणं किंवा डोळ्यांतून सतत पाणी येणं अशी लक्षणं मुलांमध्ये दिसली तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.

५. मुलांच्या आहाराकडे विशेष लक्ष द्या. डोळ्यांच्या आरोग्यासाठी पोषक ठरणारे पदार्थ मुलांना जास्त प्रमाणात खायला द्या. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आतापासून काही गोष्टी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

# मोर्बा रोडवर विद्युत तारा उघड्यावर

## ◆ पथदिवे दोन महिन्यांपासून बंद ◆ परिसरात अंधाराचे साम्राज्य

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील नेहमी गजबजलेला मोर्बा रोड येथील गेले दोन महिने महामार्गावरील उपजिल्हा रुग्णालय ते दिनेश पवार यांच्या इमारतीच्या ५०० मिटर अंतरातील सुमारे २० विद्युत खांबावरील पथदिवे गेल्या दोन महिन्यांपासून बंद स्थितीत असल्याने या परीसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.



दिघी-माणगाव-पूणे हा महामार्ग नव्याने तयार करण्यात आला आहे. त्यावेळी उपजिल्हा रुग्णालय ते दिनेश पवार यांच्या इमारती पर्यंत जमिनीखालून महामार्गावरील पथदिव्यांसाठी विद्युत जोडणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे एक वर्षांपूर्वी करण्यात आली होती, मात्र हे पथदिवे कधीच कायमस्वरुपी प्रकाशले नाहीत. कधी मंद तर कधी बंद अशी अवस्था झाली होती. आता तर हे पथदिवे दोन महिने कायम स्वरुपी बंद अवस्थेत आहेत. हि जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची असूनह त्यांनी या समस्येकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. याबाबत माणगाव नगरपंचायतीने वारंवार पत्रव्यवहार आणि फोनवरून संपर्क साधला असता उडवा उडवीची उत्तरे देण्यात येतात. तसेच प्रांताधिकारी माणगाव यांच्या कडेही याबाबत लेखी निवेदन देण्यात आले आहे, मात्र अद्यापही पथदिव्यांचा प्रकाश पडलेला नाही. विद्युत जोडणी करताना विद्युत तारा जमिनीखालून जोडण्यात आलेल्या नाहीत. त्या प्रवाहित तारा रस्त्यावरून खड्ड्याचा चर न खोदता उघड्यावर ठेवण्यात आल्या आहेत.

काही ठिकाणी त्या विद्युत तारा तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे विजेचा झटका लागून दुर्दैवी घटना घडून नागरिकांचा मृत्यू ओढवला जाण्याची भीती वाटत आहे. याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाने ही आमची जबाबदारी नाही असे सांगून हात झटकले आहेत. काही ठिकाणी या विद्युत तारा वितळलेल्या आहेत. त्यामुळे सिद्धी नगर आणि खांदाड भागातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत आहे. काही वेळा विद्युत दाब कमी जास्त होऊन इलेक्ट्रॉनिक वस्तू जळून नष्ट झाल्या आहेत. पथदिवे सुरू नसल्याने रात्रीच्या अंधारात चाचपडत जावे लागते तसेच छोटेमोठे अपघात आणि चोऱ्या होत असतात. काही ठिकाणी विद्युत उच्च दाबाच्या तारा उघड्यावर असल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. हा मोर्बा रोड दिवस रात्र गजबजलेला असून वाहनांची सतत रहदारी असते.

मोर्बा रोड हा शहरातील महत्वाचा मार्ग असून हा महामार्ग म्हसळा, श्रीवर्धन, हरी हरेश्वर, दिवेआगर या पर्यटनस्थळांना जोडला गेला आहे. त्यामुळे या मार्गावरील पथदिवे तातडीने सुरू करण्यात यावेत, अशी मागणी सिद्धीनगर आणि खांदाड भागातील नागरिकांनी केली आहे.

# तुपगाव येथील अजय मोरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**चौक : प्रतिनिधी**

तुपगाव येथील भारतीय कॉंग्रेस पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते आणि विद्यमान ग्रामपंचायत सदस्य अश्विनी मोरे यांचे पती अजय मोरे यांनी उरण विधान सभेचे आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

आमदार महेश बालदी यांनी केलेल्या विकास कामाच्या जोरावर कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते भाजपा मध्ये प्रवेश करतील असा विश्वास अजय मोरे यांनी दिला.



रायगड जिल्हा उपाध्यक्ष रामदास ठोबंरे, खालापुर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, सरपंच रवींद्र कुंभार, सदस्य कांता नागावकर, सचिन साखरे, विजय ठोसर, स्वप्ननिल नागावकर, गजाजन कुंभार, संतोष गावडे, विशाल तांबोळी व भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# पेणमध्ये दुचाकी घसरून अपघात

**पेण :** वडखळकडे जाणाऱ्या रस्त्यावर बाईकस्वार घसरून गंभीर जखमी झाला आहे. मोटरसायकल चालक (रा. पांडापूर ता. पेण) हा आपल्या ताब्यातील डूक केटीएम मोटरसायकल (एमएच ०३ सी.सी ६४९६) ही स्वत: चालवित घेऊन पेण वडखळ रोडने पांडापूर येथे जात होते.

या वेळी पेण रेल्वे स्टेशन समोरील ब्रिजसमोरील वडखळकडे जाणाऱ्या रस्त्यावर जात होता. या वेळी त्याचा मोटार सायकलवरील ताबा सुटल्याने गाडी स्लीप होवून अपघात झाला. या अपघातात त्याच्या डोक्यास व छातीस दुखापती झाल्या व मोटारसायकलचे नुकसान झाले.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# दारूचे समान वाटप न झाल्याने हल्ला; एक जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रिव्ही कंपनीच्या कंत्राटी कामगारांमध्ये वाद झाला. दारू पिण्यास बसलेल्या तिघा तरुणांमध्ये दारूचे समान वाटप झाले नाही यावरून वाद झाला आणि या वादातून एकावर लोखंडी रॉडने हल्ला झाल्याने एक जण गंभीर जखमी झाला आहे. याबाबत महाड औद्योगिक पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड एमआयडीसीमधील प्रिव्ही कंपनीच्या बाहेर वेल्डिंग चे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांमध्ये २ डिसेंबर रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास वाद झाला. जेवण करत असताना दारूचे समान वाटप झाले नाही यावरून मिथिलेश जवाहर सिंग याला राग आला आणि त्याने समोरील जेवण फेकून दिले यातून मिथिलेश आणि प्रोसंजित या दोघांमध्ये वाद सुरू झाला. यातून मिथिलेश याने शेजारी असलेल्या त्रिमूर्ती इंजिनिअरिंग मधून लोखंडी रॉड आणून मारहाण केली.

यामध्ये प्रोसंजित शांती दास हा जखमी झाला आहे. याबाबत महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चौकमध्ये जागतिक दिव्यांग दिन साजरा

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत चौक यांच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. या वेळी सरपंच रितू ठोंबरे यांनी मनोगत व्यक्त केले.

जागतिक दिव्यांग दिवस दिव्यांग व्यक्तीं वरील सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जागरूकता निर्माण करण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. या दिवसाचा उद्देश दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांची आणि गरजांची पूर्तता करण्यासाठी समाजात जागरुकता निर्माण करणे आहे. आजच्या दिवशी विविध प्रकारच्या दिव्यांगतेच्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये दिव्यांग व्यक्तींचे योगदान आणि सामर्थ्य प्रदर्शित करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा ठरतो.



दिव्यांग व्यक्तींना शारीरिक किंवा मानसिक अडचणी येत असतात, परंतु त्यांच्यात अपार क्षमता, गुण, आणि कार्यक्षमता देखील असतात. समाजाने या व्यक्तींना समान संधी आणि समर्थन देणे अत्यंत आवश्यक आहे. ग्राम विकास अधिकारी भाऊसाहेब गोलार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या वेळी उपसरपंच सुभाष पवार, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी आणि दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# एक्स्प्रेस वेवर कारला आग

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर एका कारला भीषण आग लागल्याची घटना घडली असून कार पूर्णपणे जळून खाक झाली झाली आहे. गाडीतील चालकाच्या तत्परतेने प्रवाशी तत्काळ बाहेर पडल्याने मोठी घटना टळली आहे



मुंबई-हुन पुण्याकडे रेनॉल्ड क्रिड कार (एमएच १२ एनपी ००६०) ही चालक अनिल अग्रवाल (रा पुणे) हा घेऊन जात असताना तो बोरघाटात आडोशी बोगद्याजवळ आला असता कारच्या बोनेटमधून धूर आल्याचे चालकाच्या तत्काळ लक्षात आल्याने त्याने कार बाजूला घेऊन रस्त्याच्या कडेला थांबवली व चालकाने प्रवासी बाहेर काढले. लगेच अचानक कारने पेट घेतला. आयआरबी यंत्रणा अपघातग्रस्त ठिकाणी पोचण्यापूर्वीच कार पूर्णपणे जळून खाक झाली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी घडली नाही. कार क्रेनच्या साहाय्याने बाजूला घेऊन रस्ता वाहतुकीसाठी चालू करण्यात आला.

# कोल्हापूर येथून हरवलेल्या मुलाला माणगाव पोलिसांनी केले कुटुंबाच्या स्वाधीन

**माणगाव : प्रतिनिधी**

कोल्हापूर येथून हरवलेल्या माणगांव बस स्थानकात मिळून आलेल्या मुलाला माणगांव पोलिसांनी दि.२ डिसेंबर रोजी कुटुंबाच्या स्वाधीन केले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, शाहू संभाजी निकम (वय १६, रा.कोगे,ता.करवीर,जि.कोल्हापूर) हा पहाटे ३ वाजताच्या सुमारास गस्त घालत असताना माणगांव पोलिसांना मिळून आला. त्याच्याकडे चौकशी केली असता तो हरवला असल्याचे त्यांनी सांगितले. तेव्हा त्याच्याकडून त्याचे वडील संभाजी महादेव निकम यांचा मोबाईल नंबर घेऊन माणगांव पोलिसांनी त्याच्या कुटूंबाला मुलगा माणगांव बसस्थानक येथे मिळाला असल्याचे सांगितले.

पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगांव पोलिसांनी मुलाला त्याचे वडील व मामा संजय पाटील यांच्या स्वाधीन केले.



# लोधीवलीत दिव्यांग दिन



**चौक : प्रतिनिधी**

दिव्यांग दिनाच्या निमित्ताने ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली यांच्या वतीने दिव्यांग बांधव यांचा सन्मान करण्यात आला व त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या.

ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली कार्यालयात जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग बांधव यांचा सत्कार कार्यक्रम घेण्यात आला, याप्रसंगी ग्रामपंचायत हद्दीतील २९ दिव्यांग यांना सरपंच पुजा नितीन तवले यांनी सन्मानित केले. भेट वस्तू, कॅलेंडर व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी सरपंच पूजा नितीन तवले, ग्रामपंचायत अधिकारी भाऊसाहेब गोल्हार, ग्रामपंचायत सदस्य सुभाष शिंदे, तालुका बार संघटनेचे तालुका अध्यक्ष ॲड. सचिन चाळके, दिव्यांग तालुका अध्यक्ष मंगेश पार्टे व इतर दिव्यांग उपस्थित होते.

# पिसारनाथ मंदिरात महाभिषेक

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या घनदाट जंगलात शारलोट तलावाच्या पश्चिमेस वसलेले श्री पिसारनाथ महाराज मंदिरात अभिषेक व भंडारा सोहळ्याचे आयोजन केले जाते. श्री पिसारनाथ महाराज महाभिषेक आणि भंडारा समितीच्या वतीने मंगळवारी (दि.३) आयोजित करण्यात आला.

यामध्ये सकाळी ८ वा.श्री पिसारनाथ यांच्या पिंडीवर अभिषेक करण्यात आला. पूजेसाठी बसलेल्या जोडप्यांकडून होम हवन करण्यात आले. माथेरानमधील नागरिकांनी आणि तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने याठिकाणी गर्दी केली होती. मागील अनेक वर्षांपासून श्री पिसारनाथ महाराज महाभिषेक आणि भंडारा समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी हजारोंच्या संख्येने नागरीक या सुंदर सोहळ्यासाठी उपस्थित राहतात.



# सापडलेला मोबाईल मालकाला केला परत

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठण्यातील शांतीनगर भागातील रहिवासी, हॉटेल विशालचे मालक विलास कांबळे यांचे सुपुत्र तसेच माणगाव येथील केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळेचे कर्मचारी विशाल विलास कांबळे यांनी त्यांना सापडलेला पल कंपनीचा महागडा आयफोन नागोठणे पोलिसांकडे रविवारी (दि.१) सकाळी सुपूर्द केला आहे.

त्यानंतर नागोठणे पोलिसांनी या आयफोन मोबाईलचा मालक सागर हिंदुराव कणसे, रा. मोरया होम टाऊन, चिकणी- नागोठणे यांना रविवारीच(दि.१) सायंकाळी परत केला आहे. त्यामुळे विशाल कांबळे यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




## महाराष्ट्र शासन

### अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे

एम.टी.एन.एल.वागळे इस्टेट यांचे कार्यालयीनआवार, रोड नं. १६, टोयोटो शोरूम समोर, ठाणे. (प.) ४०० ६०४.
Email ID: atc.thane-mh@gov.in दुरध्वनी क्र. ०२२-२५८२३५२८, २५८००६३७. २५८३३८२२.

(ई-निविदा)

**ई-निविदा सूचना क्र.२४/२०२४**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये विभागीय स्तर क्रिडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी त्यांचे सोबत असणाऱ्या शिक्षकांसाठी व अतिथी मान्यवरांसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था करणे बाबत दर मंजूरी करीता अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे हे पुरवठा करणारे मान्यता प्राप्त उत्पादक/पुरवठादार/ठोक विक्रेते इत्यादि यांचे कडून सदरच्या क्रिडा स्पर्धाच्या आयोजनासाठी दोन लिफाफा पध्दतीनुसार (टू-बिड) ई निवीदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन जाहीर ऑनलाईन निवीदा मागविण्यांत येत आहेत. निविदा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.क्र | वस्तूचे नांव | अंदाजित रक्कम रुपये (सर्व करांसह) | निविदा फॉर्मची किंमत परत न मिळणारी | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | विभागीय क्रिडा स्पर्धेच्या वेळी नाश्ता, चहा व भोजनासाठी इ. आवश्यक असणारे दर मंजूर करणे | रु.५०,०० लाख | रु, ५१००/- | रु.८५०००/- मात्र |

वरीलप्रमाणे दिनांक ०४.१२.२०२४ https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदरची निविदा दि.०४.१२.२०२४ ते दि.१०.१२.२०२४ पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

सही/-
(दीपक कुमार मीना, भा.प्र.से.)
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, ठाणे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-
**मौजे बोर्ले, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ११६ | ०-३६-९० पोख. ०-०१-३० एकूण ०-३८-२० | २.२३ | मे. वाधवा कन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०३/१२/२०२४.

सही/-
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ
कार्यालय २. आशादिप अपार्टमेंट
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. ९९३०३६९८६१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-
**मौजे सांगडे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १४५ | ०-१२-०० | ०.२५ | मे. वाधवा कन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०३/१२/२०२४.

सही/-
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ
कार्यालय २. आशादिप अपार्टमेंट
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. ९९३०३६९८६१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-
**मौजे सांगडे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १२५ | ०-२६-०० पोख. ०-०१-०० एकूण ०-२७-०० | ०.६६ | मे. वाधवा कन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. |
| | पैकी आर.आय.आय.एल. लि. कं. मुंबई यांचा ०-०३-०० हे.आर. चौ.मी. आणि गेल (इंडिया) लिमिटेड गॅस पाईप लाईन तात्पुरता हक्क संपादीत क्षेत्र ०-१३-०० हे.आर.चौ.मी. अबाधित ठेवून | | |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०३/१२/२०२४.

सही/-
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ
कार्यालय २. आशादिप अपार्टमेंट
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. ९९३०३६९८६१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड येथील भोगवटादार वर्ग १ आणि २ खाली नमुद करण्यात आलेल्या जमिन मिळकती हया सात बारा सदरी नमुद करण्यात आलेले कब्जेदार/भोगवटादार/मालक यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. प्रति | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | ३२२ | २/१ | ०-६६-०० पोट खराबा ०-०३-८० एकूण क्षेत्र ०-६९-८० | १४.३७ |
| २. | ३२२ | २/४ | ०-३६-५० पोट खराबा ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-३७-५० | ८.०० |
| ३. | ३२२ | २/७ | ०-३६-५० पोट खराबा ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-३७-५० | ८.०० |
| ४. | ३२२ | २/७ | ०-३६-०० पोट खराबा ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-३७-०० | ८.०० |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमिन मिळकती संदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि कब्जेदार/भोगवटादार/मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा-याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमिन मिळकती हया सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदरच्या जमिन मिळकती हया कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

सही/-
धनंदा प्रदिप मोकल
(वकील उच्च न्यायालय)

पत्ता :- शॉप नं. १४, शिव चेंबर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे. मो. नं. ९६१९५०५९५८

# नवी मुंबईत पुन्हा कचऱ्याचे ढिगारे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरात विविध ठिकाणी अस्वच्छता पसरली असून अनेक भागातील परिसरात असणाऱ्या कचराकुंड्या हटविलेल्या परिसरात कचऱ्याचे ढिगारे साचू लागले आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून उघड्यावरील कचऱ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. ज्या ठिकाणी पूर्वी कचराकुंड्या होत्या, त्या जागेवरून हटविल्या त्याजागी पुन्हा कचऱ्याचे ढिगारे साचू लागले आहेत. कचऱ्यामुळे डासांची पैदास तर वाढत आहे त्याच सोबत उंदीर-घुशीदेखील वाढले जातात. भटक्या कुत्र्यांचा वावरदेखील वाढू लागला आहे.



कचराकुंडीमुक्त शहर करण्याच्या अनुषंगाने महापालिकेच्या माध्यमातून शहरातील विविध ठिकाणच्या कचराकुंड्या मागील काही वर्षांपासून हटविल्या जात आहेत, मात्र तिथे नव्या कुंड्या ठेवल्या जात नाहीत, पालिकेने कचराकुंड्या हटविल्याने त्या ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत आहेत. कोपरखैरणे येथील तीन टाकीजवळ असणारी कचरा कुंडी हटवूनदेखील त्या जागी कचऱ्याचे ढिगारे जमा होतात तर नेरूळ सेक्टर १२ येथील बस डेपो जवळ कचऱ्याचा ढीग नित्यानियमाने साचला जात असल्याचे दिसते. ज्या वेळी सफाई कामगार कचरा उचलून नेतात त्याच्या अवघ्या तासाभरात पुन्हा त्या जागी कचरा जमा होण्यास सुरुवात होते.

कधी कधी तर कचरा रस्त्यावर येऊन जमा होतो. त्या ठिकाणी कायम भटकी कुत्री अन्नाच्या शोधात कचरा संबंध रस्त्यावर पसरवतात. काही वेळेस अन्नाच्या पिशव्या उंदीर, घुशी फोडून सगळे अन्न रस्त्यात पसरले जात असल्याचे चित्र कायम पहावयास मिळत आहे. अशीच परिस्थिती इतर ठिकाणीदेखील पहावयास मिळते.

### सर्वेक्षण संपल्यानंतर कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष

कचरा संकलित करण्यासाठी घंटागाडीची व्यवस्थादेखील करण्यात आली आहे. स्वच्छ सर्वेक्षण काळात सार्वजनिक ठिकाणी पडणारा कचरा बंद झाला होता, मात्र सर्वेक्षण संपल्यावर अधिकारी आणि कर्मचाऱ्याऱ्यांनीदेखील दुर्लक्ष केले असून विविध ठिकाणी उघड्यावर कचऱ्याचे ढीग साचत आहेत.

# पर्वत दिनानिमित्त निघणार खारघरमध्ये सायकल रॅली

**नवी मुंबई : बातमीदार**

संयुक्त राष्ट्र संघटना चालित आंतरराष्ट्रीय पर्वत दिन साजरा करताना, निसर्गप्रेमींच्या एका गटाने एकत्र येऊन नवी मुंबईतील टेकड्यांचे संवर्धन करण्यावर लक्ष केंद्रित करणारा दोन दिवसीय कार्यक्रम आयोजित केला आहे.

जागतिक स्तरावर, ११ डिसेंबर रोजी माउंटन डे पाळला जात आहे आणि या वर्षीची थीम आहे: शाश्वत भविष्यासाठी माउंटन सोल्यूशन्स - इनोव्हेशन, अनुकूलन आणि युवक. हे लक्षात घेऊन, खारघर वेटलँड्स अँड हिल्स फोरम, अनुभूती एंडेव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड, आणि नॅटकनेक्ट फाउंडेशन ७ आणि ८ डिसेंबर रोजी सायकल रॅली आणि हिल ट्रेलचे आयोजन करणार आहेत. या कार्यक्रमांना स्नेक अवेअरनेस असोसिएशन आणि वन विभाग, पनवेल यांचे सहकार्य लाभले आहे.

पर्यावरणात पर्वत आणि टेकड्या पाणी शोषून घेत महत्त्वाची भूमिका बजावतात. वनौषधी, वनस्पती, झाडे आणि विविध प्राण्यांचे घर यांचा नैसर्गिक खजिना म्हणून त्यांचे तुकडे होत आहेत, असे संयोजक ज्योती नाडकर्णी यांनी सांगितले. खारघर वेटलँड आणि हिल्स फोरम शहराच्या मध्यभागी असलेल्या आपल्या भावी पिढीसाठी हे निसर्गाचे अस्तित्व जतन करण्यासाठी प्रशासनापेक्षा अधिक लोकांना आठवण करून देणे हे आमचे ध्येय आहे, असे त्या म्हणाल्या. नवी मुंबईला खारघरच्या टेकड्यांचे आशीर्वाद लाभले असून ते प्रतिष्ठित आणि निसर्गरम्य पांडवकडा धबधबे सौंदर्यात भर घालतात, असे ज्योती नाडकर्णी म्हणाल्या.

नॅटकनेक्टचे संचालक बी.एन.कुमार यांनी, लोकांमधील उदासीनता आणि अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे निसर्गाचा नाश होत आहे. त्यात टेकड्यांचाही समावेश आहे. आपण सर्वजण आपल्या प्राथमिक शाळांमध्ये पर्यावरण या विषयाचा अभ्यास करतो आणि मोठे झाल्यावर तो विसरतो. आंतरराष्ट्रीय पर्वत दिनासारख्या कार्यक्रमांमुळे आशा आहे की सार्वजनिक विवेक जागृत होईल आणि अधिकाऱ्यांना उत्तरदायी बनवेल, कुमार म्हणाले. नॅटकनेक्टने देशव्यापी मोहीम सुरू करण्याचे व्रत घेतले.

कुमार हे श्री एकविरा आई प्रतिष्ठानचे संचालक नंदकुमार पवार यांच्यासमवेत सेव पारसिक हिल्स या मोहिमेसोबत काम करत आहेत.

# उरणमध्ये आरोग्यविषयक शिबिरांना प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेने रविवारी (दि.१) कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन, उरण येथे संस्थेतर्फे आयोजित केलेले भव्य दिव्य रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, मोफत नेत्र तपासणी, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, मोफत चष्मे वाटप शिबीर मोठ्या उत्साहात झाले. या शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला.



या शिबिरात आर झूनझूनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल तर्फे डॉ. ओमकार पाटील, डॉ. सुदेश पाटील, टेक्निशियन अक्षता पार्टे, नेहा कदम, कॅम्प कोओर्डीनेटर-विजय बामने, रूचिता पाटील आदींनी २०१ रुग्णांची नेत्र तपासणी केली व अनेक रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियादेखील केली. तर पनवेल हॉस्पिटल (ओल्ड पनवेल) तर्फे डॉ. सुरेश करांडे, डॉ. आरती करांडे यांनी १०१ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत मार्गदर्शन केले. विविध रोगाचे निदान केले.

तेरणा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल नेरूळ नवी मुंबईच्या तेरणा ब्लड बँकेचे टेक्निशियन केसरीनाथ भगत, नितीन पाटील, सोशल वर्कर दत्ता राठोड तसेच समर्पण ब्लड बँक घाटकोपरचे सिस्टर शिला वाघमारे, डॉ. देवांशी, राजेश सोळंकी, सामाजिक कार्यकर्ते सुनिल वर्तक यांनी तरुणांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करून रक्तदानासाठी महत्त्वाचे सहकार्य केले. या शिबिरात १३६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# प्रदीप शिंदे सेवानिवृत्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रदीप बाळाराम शिंदे, कनिष्ठ सहायक, प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली हे ३० नोव्हेंबरच्या मध्योनानंतर २९वर्षे प्रदीर्घ सेवा करून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली यांच्यातर्फे निरोप समारंभ देण्यात आला.

या कार्यक्रमासाठी उपस्थित डॉ. सायली मानकर, डॉ. रेखा गायकवाड, दत्ता हिंदोळा, सुप्रिया कटारे, शरद बडे, नारायण आयरकर, संदेश गोवारी, राजाराम चव्हाण, पांडुरंग घुले, अशोक म्हात्रे, गायत्री कदम सिस्टर, सुनंदा रविढोणे, कल्पना शहासने, सुनिता वानखेडे, स्मिता मढवी, योगेश भोसले, समीर वाशीकर आदी उपस्थित होते.

निरोप समारंभाच्या कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांनी शिंदे कुटुंबियांना सेवानिवृत्तीच्या व पुढील निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा देऊन त्यांचा व त्यांच्या कुटुंबियांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला.

# मोहोपाड्यात रस्ता काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील तात्यासाहेब म्हस्कर ते सार्वजनिक शौचालय या कॉक्रीटीकरण रस्त्याच्या कामाचे भुमिपुजन सरपंच उमा संदीप मुंढे, सदस्या रसिका राकेश खराडे, सदस्या प्रतिक्षा रोशन राऊत आणि सदस्य आकाश अमृत जुईकर यांच्या हस्ते करण्यात आले.



या कॉक्रीट रस्त्याचे काम एमएमआरडीए निधीतून करण्यात येणार असून या रस्त्यामुळे पंचशिलनगरमधून रस्त्यावर येणाऱ्या सांडपाणी निचराला आळा बसणार आहे. मोहोपाडा गावात प्रवेश करताना बाजारपेठे व्यतिरीक्त याच रस्त्याचा मोहोपाडाकर, आळी आंबिवली, शिंदीवाडी तसेच आसपासच्या वाड्या व परिसरातील नागरिक वापर करतात. या रस्त्यावरुन रहदारी वाढल्याने रस्त्याचे काम व्हावे, अशी नागरिक मागणी करत होते.

अखेर पंचशिलनगर जवळील सार्वजनिक शौचालय ते तात्यासाहेब म्हस्कर रस्त्याला मुहूर्त मिळाला असून सोमवारी (दि.२) या रस्त्याच्या कॉक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन करुन काम सुरू करण्यात आले.

या वेळी माजी सरपंच संदीप मुंढे, माजी सरपंच रोशन राऊत, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार राकेश खराडे, माजी सदस्य स्वप्निल राऊत, संतोष मैदर्गीकर, सुभाष अहिर, पांडू भौड, संदिप म्हात्रे, चेतन जाधव, मनिष गायकवाड, संजय म्हस्कर, जयेश गायकवाड, कंत्राटदार रोहित पाटील, संतोष चलवादी, राजेश सोले आदी उपस्थित होते.



























**पनवेल : विधानसभा निवडणुकीत विजयाचा चौकार मारणारे आमदार प्रशांत ठाकूर यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

# माणगाव शहरावर सीसीटीव्ही वॉच

## गुन्हेगारी प्रवृत्तीवर राहणार करडी नजर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असून मुंबई-गोवा महामार्गावरील महत्त्वाचे शहर आहे. येथे गुन्हेगारांचा तत्काळ तपास लावण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज होती. गेले अनेक दिवस माणगावकर सीसीटीव्हीच्या प्रतीक्षेत होते. आता येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असून लवकरच कार्यान्वित होणार आहेत.



माणगाव नगरपंचायत स्थापन होऊन १० वर्षे लोटली. शहरीकरणाबरोबरच नागरीकरणही वाढू लागल्याने गुन्हेगारी डोके वर काढू लागली आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस सदैव रस्त्यावर असतात. तरीही गुन्हेगार हुशार झाले आहेत. माणगाव नगरपंचायतीने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शहरात महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव दिला होता. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीमधून ९३ लाख रुपये सीसीटीव्ही कॅमरे बसविण्यासाठी मंजूर झाले. हे सीसीटीव्ही कॅमरे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे.

माणगाव शहरातील महत्त्वाच्या ४७ ठिकाणी तब्बल १२२ कॅमरे बसविले गेले आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव बाजारपेठेत ठिकठिकाणी, गर्दीच्या ठिकाणी, मोर्बा रोड, निजामपूर रोड, बसस्थानकासमोर, कचेरी रोड तसेच शाळा, विद्यालय, महाविद्यालय, नगरपंचायतीच्या सार्वजनिक ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

या कॅमेऱ्यांमुळे माणगाव शहरात गुन्हेगारीला आळा बसणार असून एखादी गुन्ह्याची घटना घडल्यास पोलिसांना तपास करण्यात मदत होणार आहे. त्यामुळे या तिसऱ्या डोळ्याची गुन्हेगारांवर करडी नजर राहणार आहे.

> **जिल्हा नियोजन समितीमार्फत सुमारे ९३ लाख रुपये निधीतून माणगाव नगरपंचायत हद्दीत महत्वाच्या ४७ ठिकाणी १२२ कॅमेरे लावण्यात आले असून पुढील आठवड्यात डेमो देण्यात येणार आहे. ही कार्यप्रणाली माणगाव पोलिसांच्या अधिपत्याखाली कार्यरत असणार आहे. सीसीटीव्हीमुळे शहरात येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या व गुन्हेगारीवर करडी नजर राहणार आहे.**
>
> **-संतोष माळी, मुख्याधिकारी, माणगाव नगरपंचायत**

# श्रीवर्धनमधील कोळंबीच्या सोड्यांना पर्यटकांची मोठी मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील जीवना बंदर जेट्टी, भरडखोल, दिघी या ठिकाणी दररोज ताज्या मासळीचा लिलाव होत असतो. या ठिकाणी होत असलेला लिलाव पाहण्यासाठी तसेच ताजी मासळी खरेदी करण्यासाठी मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, रत्नागिरी अलिबाग इत्यादी ठिकाणाहून आलेले पर्यटक तसेच खवय्ये मोठ्या प्रमाणात श्रीवर्धन तालुक्यात येत असतात. सध्या कोळंबीच्या सोड्यांना मोठी मागणी आहे.





श्रीवर्धन तालुक्यातील काही मच्छीमार आपल्या मच्छीमार नौका घेऊन पहाटे मासेमारीसाठी समुद्रात जातात व संध्याकाळी ताजी कोळंबी घेऊन ते परत जीवना बंदरावर येतात. त्यामुळे ताजी मासळी घेण्यासाठी व पाहण्यासाठी पहिली पसंती श्रीवर्धन तालुक्याला मिळत असते.

ताजी कोळंबी घेऊन तेथील मच्छिमार महिलावर्ग रात्रभर जागून ती सोलून त्याचे सोडे काढून एका लाकडी फळीला लावून ठेवतात. दिवसभर उन लागल्यावर कोळंबीचे सोडे उत्तम प्रकारे वाळवले जातात. हे सोडे खाण्यासाठी अतिशय चवदार असल्याने खवय्ये त्यावर ताव मारत असतात. कोळंबीच्या सोड्यामध्ये अबांट कोकम अथवा चिंच, आंबा टाकल्यावर त्याची चव आणखी छान लागते.

श्रीवर्धनमध्ये कोळंबीच्या सोड्याला मोठी मागणी निर्माण झाली आहे. या मागणीमुळे स्थानिक कोळंबी उत्पादनकर्त्यांना चांगला लाभ होण्याची शक्यता आहे. कोळंबी सोड्याचे बाजारात विशेषतः सणासुदीच्या काळात अधिक मूल्य वाढते, ज्यामुळे व्यापाऱ्यांनी आणि कोळंबी उत्पादकांनी सध्याच्या बाजारपेठेत फायदा घेण्यासाठी तयारी केली आहे. समुद्र किनाऱ्याजवळील जीवना कोळीवाडा, मुळगाव कोळीवाडा, भरडखोल, दिवेआगर, दिघी या गावातील मच्छीमारांनी त्यांच्या उत्पादनाची गुणवत्ता व प्रमाण वाढवण्यासाठी ताज्या कोळंबीवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे, कारण सध्या कोळंबच्या सोड्याला मागणी आहे.

# पतसंस्थेइतकीच आर्थिक शिस्त कर्जदारांनी पाळावी -अतिश म्हात्रे




**मुरुड : प्रतिनिधी**

बॅंकिंग क्षेत्रातील आर्थिक व्यवहार हे नियमाने चालतात. बहुतांश पतसंस्था आर्थिक व्यवहार करताना सहकार कायद्याचे अधिन राहूनच ठेवीच्या प्रमाणात कर्ज वितरित करीत असतात. ठेवीदारांच्या ठेवीतून गरजू व्यक्तीला कर्ज दिले जाते. त्यामुळे कर्जदारानेदेखील आर्थिक शिस्त पाळून वेळच्या वेळी कर्ज रक्कम भरली पाहिजे, असे प्रतिपादन एनकेजीएस बँकेचे डेप्युटी मॅनेजर अतिश म्हात्रे यांनी केले.

जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित मुरूडतर्फे नांदगाव शाखेच्या २२व्या वर्धापन दिनी माळी समाज सभागृहात आयोजित सभासद मेळाव्यात मार्गदर्शन करताना म्हात्रे बोलत होते. पतसंस्थेने पडत्या काळात कर्ज दिले असता कर्जदाराने उतराई म्हणून अधिकची रक्कम उपलब्ध असल्यास ठेव म्हणून अशा संस्थेत गुंतवणूक करावी, असा सल्ला त्यांनी दिला.

ॲमेझॉनवरून खरेदी करताना तसेच ऑनलाईन खरेदी करताना ओटीपीसंदर्भात जागरूकता राखावी तसेच पॅन कार्ड, आधारकार्ड देताना सावधानता बाळगण्याचे आवाहनही म्हात्रे यांनी केले.

या कार्यक्रमास व्यासपीठावर श्रीराम पतसंस्थेचे चेअरमन दिलीप जोशी, व्हाईस चेअरमन मेघराज जाधव, सचिव सुनील विरकुड, कोषाध्यक्ष बाळकृण कासार, संचालक गणेश ठोसर, सरव्यवस्थापक संजय ठाकूर, नांदगाव सरपंच शेजल घुमकर, नांदगाव शाखा समिती सदस्य पांडुरंग निरकर, उदय रणदिवे आदी उपस्थित होते. प्रास्तविकात चेअरमन दिलीप जोशी यांनी संस्थेच्या ठेवी ५१ कोटी असून ३६ कोटींचे कर्ज वितरित केल्याचे सांगून एकत्रित व्यवसाय ८७ कोटी झाल्याची माहिती देत सलग १० वर्षे सभासदांना १२ टक्के लाभांश वितरीत करून अ वर्ग कायम ठेवल्याचे सांगितले. नांदगाव शाखेचे येत्या दोनवर्षात नूतन वास्तुत स्थलांतर करू, असा विश्वास सभासदांना दिला.

या वेळी सहकार भारती रायगड जिल्हा अध्यक्षपदी मेघराज जाधव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा म्हात्रे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी सोनेतारण विषयावर मुरूड शाखा व्यवस्थापक विनोद जोशी यांनी, महिला सक्षमीकरण योजनेवर नांदगाव शाखा व्यवस्थापिका सिद्धी गद्रे यांनी, तर श्रीराम भविष्य बाल बचत योजनेविषयी चेहेर शाखा व्यवस्थापक सिद्धेश निरकर यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील विरकुड यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गणेश ठोसर यांनी मानले.

# ॲड. रेखा राणे यांना समाजभूषण पुरस्कार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

समर्थ फाऊंडेशन आणि एज्यूरिक हब ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्रदान सोहळा ठाणे येथे पार पडला. यामध्ये अलिबागच्या थळ-भाल गावातली ॲड. रेखा सुधीर राणे यांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला.




या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिल्हा न्यायालय बार असोसिएशन ठाणे येथील अध्यक्ष ॲड. प्रशांत कदम, समर्थ फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीपक साबळे उपस्थित होते.

या कार्यक्रमावेळी ॲड. प्रशांत कदम यांच्या हस्ते ॲड. सुनिता साबळे लिखित कायद्याची पायरी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

ॲड. रेखा राणे यांनी मनोगतात म्हटले की, राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार आज मला मिळाला याद्वारे आपण केलेल्या कामाची दखल घेतली जाते व त्या कामाला योग्य न्याय मिळतो. त्या वेळी आपण करत असलेल्या कामात अजून उत्साह येतो व अजून जोमाने, नव्या उमेदीने काम करण्याची आवड निर्माण होते. आज तोच दिवस माझ्यासाठी आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ॲड. सुनिता साबळे यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रुती पाटील यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

# पायाभूत सोयी-सुविधा अनुदानासाठी प्रस्ताव द्या

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अल्पसंख्याक विकास विभागाकडून धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थीबहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/नगर परिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभुत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील इच्छुक शाळांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता विहीत नमुन्यातील अर्जासह परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती, रायगड-अलिबाग ज.द. मेहेत्रे यांनी केले आहे.

# डॉ. झाकीर हुसेन मदरसा योजनेसाठी प्रस्ताव सादर करा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना २०२४-२५ अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील मदरशांनी सन-२०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता विहित नमुन्यातील अर्जासह सहपरिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव उच्चस्तरीय निवड समिती ज.द. मेहेत्रे यांनी केले आहे.

# जागतिक एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त जनजागृतीपर रॅली

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जागतिक एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या नियोजनानुसार जनजागृतीपर प्रभात फेरीचे आयोजन अलिबाग येथे सोमवारी (दि. २) करण्यात आले होते.




या रॅलीचे उद्घाटन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव अमोल शिंदे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी-घुगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. या रॅलीत निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण शिंदे, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. शितल स्वामी, डॉ. लायन्स क्लब श्रीबागच्या अध्यक्ष विजय वनगे, मेट्रन अनिता भोपी, नर्सिंग स्कूलच्या प्राचार्य सारिका पाटील, त्वचा व गुप्तरोग विभागाचे डॉ.सुयश वीरकर, जिल्हा क्षयरोग केंद्राचे प्रतिनिधी डॉ. अक्षयराज राठोड उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबईचे प्रकल्प संचालक यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रायगड जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागामार्फत जागतिक एड्स प्रतिबंधक दिन व सप्ताहनिमित्त १ ते ९ डिसेंबर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी सकाळी ९ वाजता 'टेक द राईट्स पाथ' या थीमवर आधारित रॅलीचे आयोजन जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या प्रांगणात करण्यात आले.

रॅली जिल्हा रुग्णालय या ठिकाणावरून सुरू होऊन एसटी स्टॅण्ड ते छत्रपती शिवाजी चौक, बालाजी नाका अशी फिरून जिल्हा रुग्णालय या ठिकाणी सांगता करण्यात आली. या रॅलीत शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, जेएसएम कॉलेज, पीएनपी कॉलेज, नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला तसेच हातात फलक घेऊन व घोषवाक्य देऊन एचआयव्ही-एड्सविषयी जनजागृती केली.

यानंतर अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी-घुगे यांनी रॅलीकरिता उपस्थित असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनी एचआयव्ही/एड्स संसर्गित असणाऱ्या व्यक्तींना कलंकित समजून भेदभाव करणार नाही. तसेच सदरची व्यक्ती मानवाधिकारापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेईन अशा आशयाची शपथ घेण्यात आली. यावेळी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक. संजय माने यानी या वेळी १ डिसेंबर जागतिक दिनाचे महत्व सांगून १ ते ९ डिसेंबरदरम्यान राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाबाबत थोडक्यात माहिती देण्यात आली. रॅली जिल्हा रुग्णालयाच्या प्रांगणात आल्यानंतर विद्यार्थी, विद्यार्थिनींना सामाजिक बांधिलकीतून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्याकडून बिस्किटांचे वाटप करण्यात आले, तर लायन्स क्लब श्रीबाग यांच्याकडून बिस्कीट व पाणी वाटप करण्यात आले.

या वेळी कार्यालयीन अधीक्षक राजेश किणी, जिल्हा सहाय्यक लेखा रवींद्र कदम, जिल्हा सहाय्यक एम ॲण्ड ई रश्मी सुंकले, जिल्हा सहाय्यक कार्यक्रम संपदा मळेकर डापकु, आयसीटीसी प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता तुळपुळे, अमित सोनवणे, समुपदेशक अर्चना जाधव, कल्पना गाडे, मोबाईल आयसीटीसी व्हॅन समुपदेशक रामेश्वर मुळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, वाहनचालक अतिश नाईक, क्लिनर रूपेश पाटील, वाहनचालक महेश घाडगे, क्लिनर मंगेश पिंगळा, एआरटी कर्मचारी समुपदेशक दीप्ती चव्हाण, अक्षय बेरड, डेटा मॅनेजर कोमल लोखंडे, स्टाफ नर्स पल्लवी पडवळ, औषधनिर्माती सायली म्हात्रे, आरबीएसके समन्वयक सुनील चव्हाण, आधार ट्रस्ट पनवेलच्या प्रतिनिधी जागृती गुंजाळ, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट पेणच्या प्रतिनिधी रूचिता म्हात्रे तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील अधिसेविका, सहाय्यक अधिसेविका, नर्सिंग ऑफिसर, परिसेविका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका, अधिपरिचारिका, जिल्हा सामान्य रुग्णालयातील कार्यालयांमधील व ओपीडीमधील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन सिकलसेल समन्वयक प्रतिम सुतार यांनी केले, तर आभार संजय माने यांनी मानले.

### कामगिरीचा गौरव

***प्रारंभी सन २०२३-२४ मध्ये आयसीटीसी ग्रेडींगनुसार उत्कृष्ट कामगिरी केलेल्या आयसीटीसी कर्मचाऱ्यांमध्ये प्रथम क्रमांक आयसीटीसी उपजिल्हा रुग्णालय पेण, द्वितीय क्रमांक आयसीटीसी २ जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग, तर तृतीय क्रमांक आयसीटीसी उपजिल्हा रुग्णालय पनवेल यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र तसेच प्रोत्साहनपर काम केल्याबद्दल एआरटी केंद्र रिलायन्स हॉस्पिटल लोधीवली यांना सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.***

### फ्लॅश मॉबद्वारे माहिती

***रॅलीची सांगता झाल्यानंतर पीएनपी महाविद्यालय, शासकीय महाविद्यालय अलिबाग येथील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी एचआयव्ही-एड्स विषयीमूलभूत माहिती, कलंक आणि भेदभाव, एचआयव्हीचा प्रतिबंध, एचआयव्ही संसर्गितांसाठी सेवा सुविधा एचआयव्ही व सकारात्मक जीवनशैली, एचआयव्हीमुळे देशाच्या विकासवर होणारा परिणाम, एचआयव्हीसंदर्भात तरुणांची भूमिका व जबाबदारी, एचआयव्ही कसा होता, काय केल्याने होत नाही, एचआयव्ही होऊ नये म्हणून कशी काळजी घ्यावी याबाबत फ्लॅश मॉबद्वारे माहिती देण्यात आली.***

# कर्जतमध्ये ८४ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

अनिरुद्ध अकॅडमी ऑफ डीझास्टर मॅनेजमेंट, दिलासा मेडिकल ट्रस्ट ॲण्ड रिहेबिलिटेशन सेंटर, श्री अनिरुद्ध आदेश पथक, अनिरुद्ध समर्पण पथक, पुरुषार्थ मंडलम कलश (१-एमएच-१८) : कर्जत, कडाव, नेरळ, आवळस, कोंदिवडे, दहिवलीतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरात ८४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे कर्जत -खालापूर तालुक्यातील ५०२वे रक्तदान शिबिर होते. श्री शनि मंदिरमधील रवी किरण सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जत, कोंदिवडे, आवळस व नेरळच्या उपस्थित उपासकांनी अनिरुद्ध बापूंची प्रार्थना म्हणून करण्यात आले. या वेळी मीना प्रभावळकर, डॉ. प्रशांत सदावर्ते, संजीव ठाकरे, कृष्णा जाधव, जयवंत म्हसे, अक्षय लाड, अनिल शहा, दर्शना उपाध्याय, शिरीष दिघे, राजीव गजने, गणेश राऊत, मंगेश गावकर, हेमंत सुरावकर, सुभाष पाटील, सुनील शिंदे, नितीन देशमुख आदी उपस्थित होते.

या वेळी रक्तसंकलानाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्त केंद्राचे डॉक्टर, टेक्निशियन व इतर कर्मचाऱ्यांनी केले. समीर कारुळकर, विमल डागा, मनिषा देशमुख, शैला पाटील, निला घेवारे, प्रतिभा देशमुख, लता कुलकर्णी, सरला पाटील, संदीप पाटील, विष्णू देशमुख, कविता शिंदे, रीना शिंदे, स्वरुपा बदले, सुमन दिघे, जुई दिघे, राज दिघे, सिद्धी मुळे, अलका महाडिक तसेच कोंदिवडे, आवळस व नेरळ येथील अनेक उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरावादरम्यान स्मिथ दुखापतग्रस्त

## दुसऱ्या कसोटीपूर्वी ऑस्ट्रेलियाच्या गोटात चिंतेचे वातावरण

**अ‍ॅडलेड : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावसकर ट्रॉफीसाठी सुरु असलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना अ‍ॅडलेडच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. या सामन्यासाठी दोन्ही संघ नेट्समध्ये कसून सराव करताना दिसते. एका बाजूला भारतीय संघात स्टार खेळाडू दुखापतीतून सावरून परतण्यासाठी सज्ज आहे. दुसरीकडे बॅकफूटवर असलेल्या ऑस्ट्रेलियन संघाच्या ताफ्यात दुखापतीचे ग्रहण लागले आहे. नेट्समध्ये प्रॅक्टिस करताना हाताच्या अंगठ्यावर चेंडू लागल्यानंतर स्टार फलंदाज स्टिव्ह स्मिथने सराव सोडून बाहेरचा रस्ता धरला. त्यामुळे हा खेळाडू डे नाईट कसोटीतून आउट होणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.



पर्थच्या कसोटीत मोठ्या पराभवातून सावरून मालिकेत बरोबरी साधण्यासाठी ऑस्ट्रेलियन संघ कसून सराव करत आहे. अशातच स्मिथला नेट्समध्ये सराव करताना चेंडू हाताच्या अंगठ्यावर लागला. त्यामुळे त्याने सराव बंद करून थेट बाहेरचा रस्ता धरला. त्याची ही दुखापत किती गंभीर आहे या संदर्भात कोणतेही अपडेट्स समोर आलेले नाहीत, पण जर तो पिंक बॉल कसोटीतून आउट झाला, तर ऑस्ट्रेलियन संघासाठी तो मोठा धक्काच असेल.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील पहिल्याच सामन्याआधी भारतीय संघातील स्टार बॅटर शुबमन गिल दुखापतग्रस्त झाला होता. सराव करत असताना फिल्डिंग वेळी त्याच्या हाताच्या अंगठ्याला दुखापत झाली होती. या दुखापतीतून तो आता सावरला आहे. ऑस्ट्रेलियन प्राइम मिनिस्टर इलेव्हन संघाविरुद्ध अर्धशतकी खेळी करत त्याने दमदार कमबॅक करण्यासाठी तयार असल्याचे संकेत दिले आहेत. एका बाजूला भारतीय संघाला मोठा दिलासा मिळाला असताना ऑस्ट्रेलियन ताफ्यात टेन्शनचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसते.

**...तर ‘कांगारूं’ना धक्का!**

स्टीव्ह स्मिथ हा ऑस्ट्रेलियन संघातील हुकमी एक्काच आहे. २०१०मध्ये कसोटीत पदार्पण करणाऱ्या या ऑस्ट्रेलियन स्टार क्रिकेटनंर आतापर्यंतच्या १०९ सामन्यात नऊ हजार ६८५ धावा केल्या आहेत. भारतीय संघाविरुद्धही त्याचा रेकॉर्ड उत्तम आहे. टीम इंडियाविरुद्ध १८ कसोटी सामन्यात त्याच्या खात्यात ६५च्या सरासरीने १८८७ धावा जमा आहेत. त्यामुळेच पिंक बॉल कसोटी सामन्याला तो मुकला तर ऑस्ट्रेलियन संघासाठी हा मोठा धक्का ठरेल.

# सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये सूर्या आणि शिवमची फटकेबाजी

**हैदराबाद : वृत्तसंस्था**



भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेतील टी-२० सामन्यात धमाकेदार एन्ट्री मारली आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली मुंबईकडून खेळताना सूर्याने ४६ चेंडूत ७० धावांची तडाखेबंद खेळी केली. मुंबई आणि सर्विसेस यांच्यातील टी-२० सामना हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानात रंगला आहे.

सर्व्हिसेसच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. मुंबईचा सलामीवीर पृथ्वी शॉ पुन्हा एकदा तीन चेंडूचा सामना करून शून्यावर बाद झाला. कर्णधार श्रेयस अय्यर १४ चेंडूत २० धावा करून परतला. अजिंक्य रहाणेही १८ चेंडू खेळून २२ धावांवर बाद झाला. मुंबईच्या संघाने ६० धावांवर आघाडीच्या तीन विकेट्स गमावल्या होत्या. त्यानंतर सूर्याचा क्लास शो पाहायला मिळाला.

या सामन्यात सूर्याच्या भात्यातून तुफान फटकेबाजी पहायला मिळाली. त्याच्यासोबतच शिवम दुबेईचीदेखील मुंबईच्या संघात एन्ट्री झाली आहे. सर्विसेसविरुद्धच्या सामन्यात शिवमने ३७ चेंडूत ७१ धावांची नाबाद खेळी केली. आयपीएलमध्ये सूर्यकुमार यादव हा मुंबई इंडियन्सकडून खेळतो. दुसरीकडे शिवम दुबे हा चेन्नईच्या ताफ्यात आहे, पण सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत या दोघांनी एकत्रित मिळून मुंबई संघासाठी १३० धावांची दमदार भागीदारी रचताना प्रतिस्पर्धी संघातील गोलंदाजांना धू धू धुतले.

सूर्याने सात चौकार आणि सात षटकाराच्या मदतीने त्याने ४६ चेंडूत ७० धावांची दमदार खेळी केली. त्याला दुसऱ्या बाजूने शिवम दुबेने उत्तम साथ दिली. शिवम ३६ चेंडूत दोन चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ७१ धावांवर नाबाद राहिला. या दोघांच्या दमदार खेळीच्या जोरावर मुंबईच्या संघाने निर्धारित २० षटकात ४ बाद १९२ धावा केल्या.



## उत्तम माने यांचा पदकांचा चौकार

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यस्तरीय खेलो इंडिया स्पर्धा नाशिक येथील मीनाताई ठाकरे स्टेडियममध्ये झाली. या स्पर्धेत नवी मुंबईतील सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य उत्तम माने यांनी ६५+ वर्षावरील गटात सहभागी होऊन एक सुवर्ण आणि तीन रौप्यपदके जिंकली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील सुमारे ८३० खेळाडू सहभागी झाले होते.

उत्तम माने हे मूळचे सातारा जिल्ह्याच्या कराड तालुक्यातील गोंदी या गावचे रहिवासी असून ते सानपाडा येथे स्थायिक झाले आहेत. ते सध्या ७० वर्षांचे असून तरुणांना लाजवेल अशी त्यांनी कामगिरी केली आहे. माने यांनी हातोडाफेकमध्ये सुवर्ण, तर भालाफेक, थाळीफेक आणि ४ X१०० मीटर रिले स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. नाशिक जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

## विकेट घेतल्यानंतर जल्लोष करताना गोलंदाजाला दुखापत

**किंग्सटाउन : वृत्तसंस्था**

अंडर १९ आशिया चषक स्पर्धेत बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात नेपाळचा फिरकीपटू युवराज खत्रीने विकेट घेतल्यानंतर जल्लोष करताना स्वत:लाच दुखापत करून घेतली. याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

बांगलादेशविरुद्ध गोलंदाजी करताना युवराज खत्रीने डावाच्या २८व्या षटकात लागोपाठ दोन चेंडूंत दोन विकेट्स घेतल्या. युवराजने पहिली विकेट घेतली तेव्हा त्याने दक्षिण आफ्रिकेच्या तबरेझ शम्सीच्या स्टाईलमध्ये शूज काढून सेलिब्रेशन केले. दुसऱ्या विकेटनंतर युवराज इतका उत्तेजित झाला की, वेगात धावताना त्याचा पाय मुरगळला. त्यामुळे तो मैदानावर आडवा झाला. यानंतर त्याला चालताही येत नव्हते. सहकारी खेळाडूने त्याला पाठीवर बसवून नेले.



## राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत मॉडर्न स्कूलचे यश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलमधील विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. ही स्पर्धा नुकतीच धुळे येथे झाली.

या स्पर्धेत राज्यभरातून विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये मॉडर्न स्कूलची श्रावणी राजू चिंचोलकर हिने १७ वर्षाखालील मुलींच्या ३६ ते ४० किलो वजनी गटात रौप्य, स्वरा महेश कदमने ४० ते ४४ किलो वजनी गटात कांस्य आणि संकल्प शिवाजी पाटीलने मुलांच्या ७४ ते ७८ किलो वजनी गटात कांस्यपदक मिळविले आहे.

विजयी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य सुमित्रा भोसले यांनी कौतुक केले. या वेळी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका हना सरेला, मनीषा सकपाळ, क्रीडा शिक्षिका प्राजक्ता, जयसिंग पवार उपस्थित होते.

## कर्जतच्या इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आंतरशालेय क्रीडा स्पर्धा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील के.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल प्राथमिक आणि माध्यमिक विभागामध्ये आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला.



संस्थेचे सचिव प्रवीण गांगल, खजिनदार मदन परमार, सदस्य सतीश पिंपरे, घेवरचंद ओसवाल तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अनुपमा चौधरी, पर्यवेक्षक सुनील बोरसे, संपदा भोगले, क्रीडा शिक्षिका प्रीती म्हात्रे, ज्योती देवघरे आदी उपस्थित होते. दीप व मशालीचे प्रज्वलन करून स्पर्धेस सुरुवात झाली. उपस्थितांनी क्रीडा प्रतिज्ञा घेतली.

प्रवीण गांगल यांनी विद्यार्थ्यांना, खेळ हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे तुमच्या शरीराला आणि मनाला उत्साह देण्यासाठी मैदानी खेळ खेळले पाहिजे, असे सांगून प्रोत्साहन दिले.



पनवेल : विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर भरघोस मतांनी विजयी झाले. त्यांनी यंदा विजयाचा चौकार लगावला. त्यांच्या या विजयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भूमिका महत्त्वाची होती. त्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले.

## उर्विल पटेलचे झंझावाती शतक

**इंदूर : वृत्तसंस्था**

सध्या सुरू असलेल्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२४मध्ये गुजरातचा फलंदाज उर्विल पटेल धुमाकूळ घालत आहे. या फलंदाजाने मंगळवारी (दि. ३) इंदूरमध्ये उत्तराखंडविरुद्धच्या सामन्यात ३६ चेंडूत शतक झळकावले.

काही दिवसांपूर्वी उर्विलने सर्वात वेगवान टी-२० शतक झळकावणारा भारतीय फलंदाज बनून इतिहास रचला होता. आता त्याने ४१ चेंडूत ११५ धावांची नाबाद खेळी केली आणि गुजरातने उत्तराखंडवर आठ विकेट्स राखून विजय मिळवला.

<u>‘ओंकार’च्या वार्षिक क्रीडा स्पर्धा</u>

## विद्यार्थ्यांनी भरपूर मैदानी खेळ खेळावेत -अर्चना खोत

**मुरुड : प्रतिनिधी**



विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात मोबाईलसोबत न खेळता मैदानावर भरपूर खेळा. मन, मनगट आणि बुद्धीचा खरा विकास मातीत खेळल्यावरच शक्य आहे. तेव्हा मुलांनी भरपूर खेळावे, असे आवाहन नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनी केले.

हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार बालवाडी व ओंकार विद्यामंदिरच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनावेळी खोत बोलत होत्या. उद्घाटन समारंभास हिंदू एज्युकेशन सोसायटी चेअरमन दिलीप जोशी, सचिव सुनील विरकुड, क्रीडा शिक्षक दत्तात्रेय खुळपे, ओंकार विद्यामंदिर अध्यक्ष दीपाली जोशी, संचालिका मनीषा फाटक, अशोक दिवेकर, विश्वस्त मनोहर गुरव, मुख्याध्यापिका प्रविता गार्डी, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष सागर राऊत, शिक्षक उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका प्रविता गार्डी म्हणाल्या यांनी, विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करून खेळाचा आनंद घ्यावा, असे आवाहन केले.














पनवेल : विधानसभा निवडणुकीत विजयाचा चौकार लगावल्याबद्दल अनेकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com